
म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १८५३
IRBK-0101853
IRBK-0101853
IRBK-0101853

इ॰ सवि १६८३

श्री॰ [illegible]

—“सदा बंदिवान”चे सहाय्यक



IRBK-0101853
IRBK-0101853

# प्रस्तावना

१९३३ सालीं ' रेडिओ स्टार्स ' या नाट्यसंस्थेसाठीं हें नाटक लिहिलें होतें आणि तारीख २ नोव्हेंबर १९३३ रोजीं त्याचा पहिला प्रयोगही रॉयल ऑपेरा हाऊस याच थिएटरांत झाला होता.

१९२९ सालापासून दोन तासांचीं त्रुटित नाटकें करण्याची सुरवात मी ' पापीपुण्य ' या नाटकानें केली. हीं ' त्रोटकें ' त्यावेळीं चांगलींच लोकप्रिय झालीं आणि अजूनही शाळाकॉलेजांच्या संमेलनांत त्यांचे प्रयोग सारखे होत आले आहेत. अलीकडे कांहीं वर्षांत अशीं त्रोटकें फारशीं लिहिलीं गेलीं नाहींत किंवा रंगभूमीवरही आलीं नाहींत. माझ्या एकसष्टाव्या वाढदिवसानिमित्य साहित्य झब्बूशाही विध्वंसक मंडळानें या नाटकाचा प्रयोग करण्याचें ठरविलें आणि त्यांतील एक भूमिका करण्यासाठीं मला बोलावण्यांत आलें. अर्थातच ती मागणी मी मान्य केली. लेखकवर्गानें एका लेखकासाठीं स्वतः रंगून रंगभूमीवर आल्याचें महाराष्ट्रांतील—नव्हे, मला वाटतें, भारत वर्षांतील—हें पहिलेंच उदाहरण आहे.

' रेडिओ स्टार्स ' च्या द्वारें झालेल्या प्रयोगाप्रमाणें या प्रयोगाचें दिग्दर्शनही श्री. पार्श्वनाथ आळतेकर यांनींच केलें, हा योगायोग महत्त्वाचा होय. मात्र या नाटकाच्या संगीताच्या दिग्दर्शनांत हिराबाई जव्हेरी यानीं पूर्वींच्या प्रयोगापेक्षां संगीताची योजना अगदींच नव्या सरणीनें केली. अरुणेच्या तोंडीं घातलेलें एकच पद तीन निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या भावनेनें म्हटलें जाण्यासाठीं त्यांनीं जी स्वर-योजना केली ती जितकी नावीन्यपूर्ण तितकीच भावनोद्दीपक आणि प्रसंगनिष्ट झाली.

या अपूर्व प्रसंगाचें स्मरण म्हणून ही आवृत्ति काढण्यांत येत आहे आणि त्यांत या प्रयोगाशीं संलग्न असणाऱ्या सर्व व्यक्तींचा परिचय चित्रद्वारें देण्यांत आला आहे.

प्रस्तुतच्या कागदाच्या महर्गतेच्या कालांत अशी सर्वांगसुंदर आवृत्ति काढण्याच्या कामीं नवभारत प्रकाशन संस्थेचे श्री. रघुनाथराव देसाई यानीं जी झीज सोसली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

हाजी कासम वाडी,<br>मुंबई,<br>ता. २५ एप्रिल १९४३ } भार्गवराम विठ्ठल वरेरकर

---

या पुस्तकांतील सर्व छायाचित्रें किरणकला मंदिर यानीं घेतलीं असून ब्लॉक डी. बी. नेरॉय आणि कंपनीनें तयार केले आहेत.

ना. १-५४

# अंक पहिला

( अरुणा वाचीत बसली आहे. जवळ फोनोग्राफ वाजत आहे. इतक्यांत रेणू येते. )

रेणू:—ऐकलंस अरु, तुझा दादा सुटला.

अरुणा:—मला माहित आहे.

रेणू:—माहित आहे ? आणि अजून मला सांगितलं नाहींस ? तुझा दादा तुझा भाऊ आहे. माझा कुणी नव्हे. पण मीही त्याला दादा म्हणत आलें. दादाच मानीत आलें, त्याची तुला जाणीवच का नाहीं ? रक्तानंच कां नातीं जोडायचीं ? स्नेहाचा लागाबांधा कुणाच्या खिजगणतींत नसतो का ?

अरुणा:—दादा सुटला—आज एक महिना झाला.

रेणू:—एक महिना झाला ?

अरुणा:—थांब. एक महिना झाला. त्याचं पत्र मला आलं. शिवणीच्या तुरुंगांतून तीन वर्षांनीं बाहेर पडल्यावर मुंबईत तोंड दाखवायला त्याला लाज वाटली. नागपूर उमरावती-कडे नोकरी मिळवायचा त्याचा प्रयत्न चालला होता—

रेणू:—किती थंडपणें बोलते आहेस ? जसं कांहीं कांहींच झालं नाहीं.

अरुणा:—( खिन्न हंसून ) कांहींच झालं नाहीं. सारं जग

पालटलं—हो—जिव्हाळ्याचीं माणसं सुद्धां पारखीं झालीं, तिथं कांहींच झालं नाहीं कसं म्हणायचं ? अणिमेशीं दादाचं लग्न ठरलेलं—तेव्हां ठरलं होतं—त्यावेळीं तो एक सभ्य माणूस होता. आतां काय होईल कुणी सांगावं ! त्याला शिक्षा झाल्यापासून तिनं त्याचं नांव टाकलं—

रेणू:—तें मी पाहतेंच आहें.

अरुणा:—मीही पाहतें आहें. पण मला तें खरें वाटत नाहीं. तिकडच्या भितीनं ती त्याचा उल्लेख करीत नाहीं—( थांबून ) कुणी सांगावं—कदाचिन् तिनं खराखुराच तिटकारा घेतला असेल ! पण आज मात्र मला भिती वाटते आहे—नव्हे धडकी भरली आहे. यांचा हा असा स्वभाव ! आणि तो आज येणार !

रेणू:—तो येणार ?—दादा येणार ? आज येणार ?

अरुणा:—हो-आज येणार—! इथं येणार. दुसऱ्या कुठं येणार ? घरदार खटल्यापायीं गेलं—अब्रू आधींच गेली होती—आतां कुठं येणार ? सत्तेची मी बहीण, श्रीमंताची बायको—ती मी अशी उभी असतांना तो काय माधवाश्रमांत जाऊन राहणार ? मन कसं खायला येतं आहे. असं वाटतं—( थांबते )

रेणू:—काय वाटतं ?

अरुणा:—असं वाटतं—काय वाटतं तेंच समजत नाहीं.

रेणू:—म्हणून का हा फोनोग्राफ लावला होतास? बंद तरी करून ठेवायचा होतास! ( ती फोनोग्राफ बंद करते. ) एकूण तुला असं वाटतं ! असं वाटतं, कीं कसं वाटतं हेंच तुला कळत नाहीं ! होय ना ? जातीची बायको आहेस कीं कोण आहेस? एकाद्या पुरुषासारखी दोन हातांत डोकं धरून बसतेस?

अरुणा:—म्हणच बदलून टाकलीस ! पुरुष खचून जात नसनात रेणू. पुरुष म्हणजे पुरुष आहेत. ते आमचे मालक आहेत. पति आहेत–स्वामी आहेत–देव आहेत—

रेणू:—दैत्य आहेत !

अरुणा:—असं म्हणू नये रेणू. असं कांहीं मनांत आलं तर मनांत ठेवावं. बोलून दाखवूं नये.

रेणू:—दांभिकपणा करावा ?

अरुणा:—हो–दांभिक बनावं. प्रामाणिकपणा हा गुन्हा आहे बरं रेणू. तुझं लग्न झालं नाहीं, म्हणून तुझ्या डोक्यांत हा प्रकाश पडत नाहीं. हंसतेस काय ! लग्न झाल्यावर अशी हंसायची नाहींस. देवाचा कोप तुला माहित नाहीं. देवाच्या कोपानं भूकंप होतात. देवाच्या कोपानं ज्वालामुखी भडकतात. भूमी रसातळाला जाते. पण तो देव कुणी पाहिला नाहीं–कुणाला दिसला नाहीं–आणि दिसेल असं वाटतही नाहीं. पण हा देव प्रत्यक्ष ! या देवाचा कोप

प्रत्यक्ष जाचतो–प्रत्यक्ष जाणवतो. हा देव प्रत्यक्ष शिक्षा देतो. त्या देवाचा हात दिसत नाहीं पण या देवाची चपराक बसली, कीं गाल प्रत्यक्ष शिणशिणतात—

रेणू:—कुठला हा देव ?

अरुणा:—पतिदेव–बाईग, पतिदेव ! म्हणूनच मी म्हटलं, कीं लग्न झाल्याशिवाय पुरुषाचा पुरुषार्थ बायकांना कळत नसतो.

रेणू:—पुरे, हें रोजचं पतिपुराण ऐकून माझे कान विटले. दादा यायचा, त्याच्या पुढं असं रडवं तोंड करूनच का सामोरी जाणार आहेस ? मन चांगलं घट्ट कर. तोंड हंसरं ठेव—

अरुणा:—तो नाहीं का दांभिकपणा !

रेणू:—नाहीं. देवानं माणसाला हंसरं तोंड आणि मिठास वाणी दिली आहे. पण आम्हांला ती राखून ठेवतां येत नाहीं. देवाला आळवलं तर दुःखाचा विसर पडतो–वृत्तीला फुलोरा येतो. रडवं तोंड कुणी ठेवावं ?—

अरुणा:—पुरुषांनीं का ?

रेणू:—होय. पण तें साहेबासमोर ! तिथं लीनता हवी असते.

अरुणा:—तसंच आमचं. तेही आमचे साहेबच ना ?

रेणू:—आतां पहा हं–मी निघून जाईन इथनं ! हांस पाहूं–हांस–हांस–हांस–छान ! आतां एक गाणं म्हण पाहूं !

अरुणा:—या वेळीं ? दादा यायचा इतक्यांत–त्याला काय

लेखक



मामा वरेरकर

दिग्दर्शक



पार्श्वनाथ आळतेकर

संगीत दिग्दर्शक



सौ. हिराबाई जव्हेरी

अरुणा



श्यामला माजगांवकर

अणिमा



सौ. प्रमोदिनी चित्रे,
बी. ए. बी. टी.

रेणू



शकुंतला लिमये

वाटेल ? म्हणेल, चंडोलासारख्या भिंगऱ्या घेत राहिली आहे बहीण !

रेणू:—म्हणूं दे. त्याला उत्तर मी देईन. तूं आपली एक गाणं म्हण.

अरुणा:—काय बरं म्हणूं ? ( थांबून ) ऐकः—

**नाहीं राहिली । माया । जरी पाही मुखा गुणी राणी व्हाया ॥ध्रु०॥ हा वाटे फुका बडिवार । या नारी जिवा करी पार । नर झाला जिला तरणी तराया ॥ १ ॥**

रेणू:—किती मत्सर वाटतो तुझा मला ! देवानं मला अशी आवाजी दिली असती—

अरुणा:—तर नाटकांत गेली असतीस. असली ही खट्याळ पोर तूं—

रेणू:—काय वाईट झालं असतं ! कुलीन स्त्री म्हणून मला भरपूर पगार तर उकळतां आला असता ! त्यांतून मला अडवून धरायला कुणी पतिदेवही नाहींत.

अरुणा:—खरंच ! हे आमचे पतिदेव ! आणि दादा आज यायचा--( केदारनाथ येतो ) कोण ? केव्हां येणं झालं ?

केदार:—बुलबुल गात होता तेव्हां. कां ? कसं रेणू ? बुलबुल कसा गात होता ? आणि दादा यायचा आहे ! हिचा दादा—

रेणू:—आणि माझाही !

केदार:—चावून चिकट ओढून बळकट नातीं लागत नसतात !

हिचा दादा! वा रे दादा! बेचाळीस पूर्वजांना स्वर्ग दाखवला बेट्यानं! अगदीं अर्धा लोकमान्य टिळक! त्यांना सहा वर्षं मिळालीं होतीं—याला तीन! अशीं देवमाणसं ज्या घराण्यांत जन्म पावतात तें घराणं केवढं मोठं! बायका घरांत डांबलेल्या असतात म्हणून ठीक—नाहींतर हिनंसुद्धां कुठं तरी दरोडा घातला असता. ही सुद्धां पाऊण लोकमान्य झाली असती. नाहीं? कसं! बोला ना बुलबुल. आम्हीं आलों कीं सारीं गाणीं बंद पडतात, बरं का रेणू? आम्हीं यांचे वैरी? भावाला नांवं ठेवतों ना आम्हीं. केवढा भाऊ! अर्धा लोकमान्य!!

अरुणा:—दुःखावर डागण्या देण्यांत इकडे काय एवढा आनंद होतो! त्याच्या हातून अपराध घडला, त्याचं फळ त्यानं भोगलं, आतां सुटून आल्यावर त्यानं झालंगेलं पाप धुऊन टाकूं नये का?

केदार:—चिखल धुऊन जात असतो. हा डाग आहे. हा जन्मभर वागवावा लागणार. त्यानं स्वतः अंग भाजून घेतलं आहे, त्याची झळ आम्हांला लागायला नको.

रेणू:—मग त्यानं आतां काय करावं?

केदार:—भीक मागावी! जीव द्यावा!—

रेणू:—भीक मागायलाच तो तुमच्या दारीं येतो आहे. झिडकारून दूर केलात तर जीव देणं आहेच पुढं!

अरुणा:—तो माझा भाऊ आहे.—

केदार:—तो माझा भाऊ नाहीं.—तो माझा भाऊ असता तरीही मी त्याला बखोटीला धरून बाहेर काढला असता—

अरुणा:—आणि तुमची बहीण—अणिमा—तिचं लग्न ठरलं आहे ना त्याच्याशीं ?

केदार:—लग्न ठरलं होतं—तेव्हां ठरलं होतं—आतां तें मोडलं. अणिमेसाठीं हल्लीं मी स्थळ पाहातों आहें.

रेणू:— अणिमेचं वय काय आहे ?

केदार:—चोविस वर्षं. कां ?

रेणू:—हें तेव्हां ठरलेलं लग्न केव्हां ठरलं ?

केदार:—झालीं सुमारें सात आठ वर्षं—

रेणू:—मग तेव्हां कां झालं नाहीं तें लग्न ?

केदार:—तोच अडला. व्यापार करायचा होता ना त्याला ? नोकरी नको ! सुखाचा दरमहा पगार मिळतो, तो नको. सट्टेबाजी हवी. एकदम श्रीमंत व्हायला हवं !

रेणू:—तेव्हां लग्न झालं असतं आणि मग तो तुरुंगांत गेला असता—मग ?

केदार:— माझी बहीण विधवा झाली असं मी समजलों असतों. हें पहा रेणू, ही cross examination पुरे कर. मी आरोपी नाहीं आणि तूं न्यायाधिशाही नाहींस. मला जें वाटतें तें मी करणार !--इथं मी धनी आहें. दुसऱ्या कुणाचीही

सत्ता मला नको आहे. ( माधवराव येतो ) या माधवराव, बसा, ऐकलंस ? हेच ते.

अरुणाः—हेच ते ! म्हणजे ?

केदारः—अणिमेला पहायला आले आहेत.

रेणूः—यांना कशाला तसदी दिलीत ? अणिमा गेली असती कीं यांना पाहायला.

केदारः—हें पहा रेणू, तुझ्या अकलेचें प्रदर्शन यांच्या समोर नको. ( अरुणेस ) ऐकलंस? अणिमा कुठं आहे ?

माधवः—एकूण ती ही नव्हे. ठीक. मी पहिल्यानं जरा घाबरलोंच होतों म्हणा ना ! पण मी असं ऐकलं आहे, त्या त्याचं तिच्याशीं लग्न ठरलं होतं ना ?

केदारः—तें सारं सोहेरसुतक आतां फिटलं आहे.

माधवः—पण लग्न ठरलं होतं !—तो इथं येत होता—रहात होता—वावरत होता—दोघं हिंडाफिरायला जात होतीं. होय ना ? एकटींच दोघं जात होतीं ?

केदारः—लग्न ठरलं नसतं तरीही गेलीं असतीं. एका घरांतलीं माणसं, नात्या—गोत्याचा संबंध. बरं, त्यावेळीं तसं त्याचं वर्तनही कांहीं नांव ठेवण्यासारखं नव्हतं—

माधवः—खरं आहे—खरं आहे—पण ती गोष्ट विसरून चालायचं नाहीं. ती येणार तेव्हां पुन्हां पुन्हां ती गोष्ट नजरेसमोर येणार—त्यांची भेट होणार—जुन्या आठवणी जाग्या असणार—

केदार:—पण तें सर्व तुमच्या मर्जीवरं राहणार.—

अरुणा:—कशावरून ? तिला विचारलं का ? तिची संमति घेतली का ?

केदार:—( हंसून ) तिची संमति ? काय विचारतेस हें ! तिची संमति कशाला पाहिजे ? तिचा काय संबंध यांत ? लग्न ठरवलं कीं तिनं नुसतं उभं राहायचं—

रेणू:—तिच्या लग्नांत तिचाच संबंध नसावा ना !

केदार:—लग्नांत मुलीची संमति कधीं कुणीं घेतली होती ?

अरुणा:—तेव्हां त्या मुली असत—आतां त्या बायका असतात—तरुण असतात.

केदार:—मी हयात आहें तोंपर्यंत ही उठाठेव आपल्याला नको. कळलं ? ( अरुणा रागानें दूर जाऊन बसते ) असं आहे हें बायकांचं—बरं का माधवराव ! हें मनावर घ्यायचं नाहीं. हे धडे तुम्हांला आधीं घेतले पाहिजेत. अहो जुन्यांच्या अनुभवावर नव्यांनीं चालायचं ना !

माधव:—जुन्यांचे अनुभव जुन्या काळचे, नव्यांचे अनुभव आतांचे. काळ बदलत चालला आहे बरं केदारनाथ ? तुम्हीं असतां ऑफिसांत डांबून पडलेले, इकडे तुमच्या ऑफिसाबाहेर काय झणाझणी चालली आहे तें कसं कळणार तुम्हांला ?

केदार:—तें राहूं दे. ( अरुणेस ) ऐकलंस ? हें पहा, अशी

भलत्यावेळीं रुसून बसूं नकोस. अणिमेला बोलाव. काय करते आहे ती तिकडे !

अरुणाः—ऐकलंस रेणू, अणिमेला बोलाव. ( रेणू जाते ) तिला सांगितलं होतं का ?

माधवः—छेः छेः तसं रंगून यायला नको आहे. मी म्हणजे फार सरळ माणूस आहें. मला तें तसलं कांहीं आवडत नाहीं. आज तुम्हीं कितीही रंगरोगण केलं, तरी उद्यां तें धुऊन जातांच खरं स्वरूप बाहेर पडणारच ना ? तेवढ्या-साठींच मी यांना तसं सांगितलं होतं.

केदारः—माधवराव अगदीं आपलेच आहेत बरं. त्यांच्याकडे तसा प्रपंच बाळगायचं कारण नाहीं. ( अणिमा व रेणू येतात ) ये अणू, बैस इथं. ऐकलंस ? चहा ठेवायला सांगि-तलास का ?–बरं का अणू, हे तुला पहायला आले आहेत.

अणिमाः—असं का ? पहा तर म्हणावं !

केदारः—अणू ! अणू ! हें काय ? हें तुला शोभत नाहीं.

माधवः—नाहीं–नाहीं ! ठीक आहे ! असा धीटपणा मला फार आवडतो.

अणिमाः—होय ना ? तर मग ऐका. मला पाहायचं कांहीं कारण नाहीं—

केदारः—म्हणजे !

अणिमाः—माझं लग्न झालं आहे.

केदार:—काय म्हटलंस ?

अणिमा:—ऐकलंत ? माझं लग्न झालं आहे. माझा नवरा हयात आहे. आणि तो असेपर्यंत मला कुणी पाहायची जरूरी नाहीं.

केदार:—बस्स ! हा फाजिलपणा पुरे झाला. मी सांगेन तें तुला ऐकलं पाहिजे.

अणिमा:—तें माझं मी पाहीन. मी सज्ञान आहें, हें तुम्हीं विसरलां असाल पण माझी आठवण चांगली धड आहे.

माधव:—बरं आहे. येतों. गुड् डे !

केदार:—थांबा हो ! अणू—

अणिमा:—एकदां मी बोललें त्यापेक्षां जास्त कांहीं मला सांगायचं नाहीं.

अरुणा:—अणू, अणूवन्सं, हें बरं नव्हे. वडील माणसं जें कांहीं करतात—

अणिमा:—तूंही वडील माणूसच आहेस. मला तुझं कांहीं ऐकायचं नाहीं.

रेणू:—कळलं ?

केदार:—तूंच ! तूंच–तूंच हिला पढवलंस ! ही सारी तुझी शिकवण–नाहीं तर अशीं उलट उत्तरं द्यायची तिची काय प्राज्ञा होती ?

रेणू:—तसं म्हणा हवं तर ! ती बोलली नसती–आंत कुढत राहिली असती म्हणून मीच तिला सांगितलं. आज तीन

वर्षं ती मन मारून बसली होती, त्या मुकेपणाचा परिणाम काय झाला ? तुम्हीं तिचा असा हा विक्रा मांडला—

केदारः—बस्स ! तोंड आटोप. कुणाला बोलतेस हें ? मला ? या घरच्या मालकाला ?

रेणूः— ऐक ! मालक ! आणि ही मालकीण !

केदारः—कुठली मालकीण ! काय सत्ता आहे तिला ? नुसती मालकाची बायको म्हणून ती मालकीण ! माधवराव, माफ करा—

माधवः—तें मी समजलों. येतों. नमस्कार. ( एकदम जातो )

केदारः—रेणू, आजपासून या घरांत पाऊल टाकशील—

अरुणाः—थांबा—ती माझ्याकडे येते—

केदारः—कुणाकडेही येवो—तिनं माझ्या घरीं येतां कामा नये.

रेणूः—अरुणाताई, तुझाही असाच हुकूम आहे ?

अरुणाः—नाहीं. केव्हांही येत जा—अगदीं सुखासमाधानानं येत जा.

रेणूः—आणि अणू, तुझं काय म्हणणं आहे ?

आणिमाः—माझं काय म्हणणं आहे ! मला कुठं वाचा आहे ?

केदारः—खरं आहे. घालीन ते तुकडे मोडून आजवर राहीलीस तसंच राहायचं असेल, तर माझी आज्ञा पाळ. नाहीं-तर हात धरून—नाहीं !—नाहीं तर कांहीं नाहीं—तुला माझा हुकूम पाळलाच पाहिजे.

चंदू



मा. कृ. शिंदे

वैजनाथ



प्रभाकर गुमे

केदारनाथ रेगे



आपा पेंडसे

माधवराव कंटक



मुंदर मानकर

अरुणाः—आणि मी म्हणजे कुणीच नव्हे का !

केदारः—नव्हे ! माझे हुकूम सर्वांनींच पाळले पाहिजेत.

रेणूः—ऑफिसांतल्या साहेबांनीं सुद्धां का ?

केदारः—गप्प बैस—माझं लग्न झालं म्हणे ! केव्हां झालं ? कुठं झालं ? कुणाशीं झालं ? (पडद्यांत—चंदूः—ताई—ताई.)

अरुणाः—अगबाई दादा !—दादा आला !

केदारः—कोण—चंदू ?

रेणूः—खरंच, दादा आला !

अणिमाः—कोण ?

चंदूः—( प्र. क. ) ताई, अरुताई—( सर्व स्तब्ध ) खरंच मी विसरलों होतों. हा स्वागताचा दिवस नव्हे—

केदारः—( मान फिरवून ) This is not a place for jailbirds.

चंदूः—हा स्वागताचा दिवस नव्हे—पंचारतीचा नव्हे—जुतेपैजारीचा आहे. अणू, तूं अजून अणूच आहेस का ? पत्रांतसुद्धां तुझी हकीकत कुणी लिहूं नये !

रेणूः—दादा, माझ्या घरीं चल. माझे बाबा माणसाच्या जातींतले आहेत. ते तुला माणुसकीनं तरी वागवतील.

चंदूः—अरुताई, मी मोकळा झालों. पत्र तुला मिळालं ना ? मी येणार नव्हतों—पण मला येणं भाग आलं. कुठंच कांहीं जमेना !—( चोंहींकडे पाहून ) रेणू, काय झालं ? कुणी

माझ्याकडे पहात सुद्धां नाहीं ! अणू, तूं अजून अणिमा रेगेच आहेस, कीं तुझं नांव बदललं ?

केदारः—रेणू, त्याला सांग–मी सभ्य माणूस आहें. माझ्या घरांत चोरदरोडेखोरांना जागा नाहीं.

चंदूः -- मी जाऊं अरूताई ?

अरुणाः—दादा—काय करूं ! काय उत्तर देऊं ? होय म्हणूं कीं नाहीं म्हणूं ?

केदारः—माझा हुकूम आहे—

अणिमाः—आणि मीही जाऊं ?

केदार—तूं ? तूं कुठं जाणार ?

अणिमाः— माझ्या पतिबरोबर !

केदारः—तुझा पति ? कोण तुझा पति ?

अणिमाः—आणखी कोण ! हा–हा चंदू—

केदारः— चंद्या तुझा पति ! केव्हां झालं तुझं लग्न ? वाः रे बायको !

अणिमाः—भटजीला दक्षिणा दिल्यानंच कांहीं लग्न होत नसतं !

रेणूः—वाः रे बायको !

केदारः—गप्प बैस. अणू, घरांत जा–घरांत जा–घरांत जा !

अरुणाः—अणू, जा–माझं ऐक, माझ्याकडे पाहा–घरांत जा—

केदारः—आणि ऐकलं, आपणही घरांत चला म्हटलं ! ( अणू हळू हळू जाते. )

अरुणा:—तीन वर्षांनीं माझा भाऊ भेटला—

केदार:—तें मला माहित आहे !—

अरुणा:—तीन वर्षानंतरची भेट—बहिणभावांनीं दोन शब्द सुद्धां बोलूं नयेत का ?

रेणू:—त्यांचं काय ऐकतेस ?

केदार:—तर कुणाचं ऐकणार ?

रेणू:—तसं नव्हे. म्हटलं, एवढे का तुम्हीं निर्दय होणार आहांत ? भाऊबहिणींत ताटातूट करण्याइतके का तुम्ही कठोर होणार ? बोलूं द्या. दोघांना घटकाभर बोलूं द्या. तो आल्या वाटेनं परत जाणारच आहे—होय ना रे दादा ? ( तो स्तब्ध राहतो ) पहा, तो 'जाणार आहें' म्हणतो आहे—

केदार:—हं—समजलों. बोला म्हणावं—काय तें एकदांच बोलून ध्या. पुन्हां ही संधी मिळायची नाहीं म्हणावं ! कळलं रेणू ? ( बोलत बोलत जातो. )

अरुणा:—( क्षणभर स्तब्ध राहिल्यावर ) दादा !—

चंदू:—अरुताई !

रेणू:—मी जाऊं का वरीं ?

चंदू:—नको. तूं इथं परकी नाहींस रेणू. जशी ही तशीच तूं !—( रेणू निश्वास टाकते ) कां ? सुस्कारा कां सोडलास ? खरं आहे. जशी ही तशी तूं नाहींस. तूं स्वतंत्र

आहेस. तुझा बापही सज्जन आहे. एक माणूस आहे. इथं माणूसकीचा साराच अभाव आहे.

अरुणाः—आतां काय करणार तूं दादा ?

चंदूः—हंसऱ्या तोंडानं यायचा मी प्रयत्न केला. अंतःकरण रडत होतं–पण बळेंच आनंदी वृत्ती ओढून आणली. पण तुम्हीं सर्वांनीं तिच्यावर विरजण टाकलं. मी इथून गेलें, त्याच वेळीं मनांतले सारे विचार कुठल्या कुठं विरून गेले. काय करणार आहें तें काय सांगूं ?

अरुणाः—तूं पाहिलंस ? तुला इथं राहतां येणार नाहीं—

रेणूः—दादा आमच्याकडे राहाणार आहे. त्याचं पत्र आलं त्याचवेळीं बाबांनीं ठरवलं. त्यांना ही कल्पना होती–अगदीं उघड उघड सारं कांहीं दिसत होतं. इथं भेटतां आलं नाहीं तर अरुताई तिकडे येईल.

अरुणाः—पण अणिमेचं काय ? तूं पाहिलंस ना रेणू, तिच्या लग्नाची कशी तयारी चालवली आहे ?—

चंदूः—अणूचं लग्न ? कुणाशीं ?

रेणूः—माधवराव कंटक आतांच तिला पाहायला आले होते--

चंदूः—माधव कंटक ! तो हरामखोर–माझ्या विरुद्ध साक्ष देणारा तो बदमाश लफंग्या ! अरू–रेणू–मी गुन्हा केला होता यांत शंका नाहीं. मी खोटा चेक वटावला खरा; पण

या पाजी म्हाद्यानं जी साक्ष दिली ती मात्र सपशेल खोटी ! केवळ सूडासाठीं—

रेणू:—सूडासाठीं ?

चंदू:—हो–सूडासाठीं. पहिल्यापासून त्याची अणिमेवर नजर होती. त्याला वाटलं, मी तुरुंगांत गेलों–पतित ठरलों, कीं माझी जागा त्याला मिळेल. नोकरच कीं नाहीं ! व्हेकन्सींच्या कल्पना लग्नाच्या बाबतींत सुद्धां त्याच्या डोक्यां-तून जात नाहींत !

अरुणा:—अस्सं ! आज तीन वर्षं यांनीं माझ्या कानींकपाळीं जी भुणभुण लावली आहे, ती याचमुळं तर ?

चंदू:—होय.

रेणू:—अणिमेची तुला आठवण होती दादा ? तिथं सुद्धां ?

चंदू:—होय रेणू. प्रत्येक पत्रांत मी लिहित होतों पण उत्त-रांत कुणीच तिची खबर लिहिली नाहीं. या ताईनं सुद्धां लिहिली नाहीं—

अरुणा:—मला बंदी होती.

चंदू:—घरीं सुद्धां सेन्सार अं ! हें असं पाहिलं, कीं आपणही कुणाचा नवरा होऊं नये असं वाटूं लागतं. कुणी सांगावं, माझी सुद्धां बुद्धि फिरायची.

रेणू:—ऐकलंस ताई ! म्हणूनच मला वाटतं, कीं जन्मभर अविवाहित रहावं—

चंदू:—खरं ! पण तो विवेक मला नाहीं. लहानपणापासून वडील माणसांनीं—थट्टेनं म्हणा, वात्सल्यानं म्हणा—आमचं नातं जोडलं. पुढं तर प्रत्यक्ष साखरपुडा केला. आपले-पणाची भावना त्यामुळं दृढ झाली. पूर्वीं लहानपणीं नव्हतीं का लग्नं होत—तसंच हें वाटलं. आम्हीं पतिपत्नी आहोंत असाच मनावरचा परिणाम होता. त्या नजरेनं पाहात होतों म्हणून तिची आठवण कायम होती. तीन वर्षांचा नरकवास ! रेणू, हीं तीन वर्षे मी कशीं घालविलीं असतील, याची कल्पना कुणाला होणार नाहीं. मी गुन्हेगार म्हणून तुरुंगांत गेलों होतों—समाजांतला एक बदमाष या नात्यानं गेलों होतों. तुरुंगांत देखील जाती आहेत. म्हणूनच मी तिथला एक कमजात गुन्हेगार होतों. तिथलीं सर्व सुखं मी चाखलीं. माझी भांडखोर वृत्ती पदोपदीं जागी होत असे, त्यामुळं अंधारकोठडीपर्यंतच्या तिथल्या साऱ्या शिक्षा मला आणखी भोगाव्या लागल्या—

अरुणा:—अरेरे !

चंदू:—तुला माझी दया येते ? कींव येते ? ही कींव आधीं दाखवायला पाहिजे होती. मी व्यापारांत पडतों असं म्हणत होतों, त्यावेळीं ही दया दाखवली पाहिजे होती. त्या वेळीं तुम्हीं मला झिडकारलं ! नोकरीचा मला तिटकारा, पण तुम्हीं मला बँकेंत नोकरी करायला भाग पाडलं. माझ्या

हातचा अर्ज सुद्धां नसतां मला सक्तीनं नोकरी देववलीत. कां? तर म्हणे अणिमेच्या कल्याणासाठीं! झालं आतां अणिमेचं कल्याण? बोल ना, त्या वेळीं तुम्हां लोकांना माझी दया कां आली नाहीं? व्यापाराचा चान्स होता, मी तुमच्या-कडे पांच हजार रुपये मागितले, एक सुंदर कापडाचं दुकान हातचं जात होतं—

अरुणाः—नको—दादा—नको, ती आठवण काढूं नकोस.

चंदूः—आतां तेवढीच आठवण शिल्लक राहिली आहे. तेवढ्याच आठवणीवर मी जगलों आहें. तेवढ्यासाठींच मी संधि साधली. खोटा चेक वटावला.—

रेणूः—म्हणजे! तो चेक तूं बनावट केला नाहींस?

चंदूः—नाहीं. माझ्या एका मित्रानं तें काम केलं—माझ्या-साठीं केलं!

रेणूः—मग त्याचं नांव कां सांगितलं नाहींस?

चंदूः—रेणू, इतका मी कृतघ्न आहें असं तुला वाटतं? कुणासाठीं त्यानं बनावट चेक तयार केला? ते पैसे त्याला मिळायचे नव्हते. मला जें येत नव्हतं तें त्यानं केलं—मैत्रीच्या मोलानं त्यानं ती मजुरी केली, त्याचं नांव मी कसं सांगूं? पण तोही मूर्ख होता. त्यानं मला सांगायला पाहिजे होतं. पुढल्या परिणामावर माझी दृष्टि गेली नाहीं. आणि आतां, सर्वस्वाची राखरांगोळी झाल्यावर आतां

तुम्हांला माझी दया येऊं लागली ? ( थांबून ) आतां कां उगी राहिलीस ?

रेणू:—तिला कां बोलतोस ? तिचा काय अपराध ? पांच हजार रुपये तिच्याकडे असते तर नसते का तिनं तुला दिले ?

चंदू:—तिच्या नवऱ्याला देतां आले असते.

अरुणा:—पण त्यांनीं दिले नाहींत त्याला मी काय करूं ? मी थोडं का विनवलं ! त्यांना पाझरच फुटेना.

चंदू:—मग तूं कसली गृहिणी ? तूं त्याची गृहदेवता ना ! तुला या संसारांत कांहींच का सत्ता नाहीं ?

अरुणा:—नाहीं—दादा—नाहीं. आतां हें म्हणतो आहेस—त्यांना दोष देतो आहेस—पण तूं त्यांच्या जागीं असतास तर तसाच नकार दिला असतास. पुरुषाची—नवऱ्याची जात इथूनतिथून सारखीच.

रेणू:—आतां बोल ना ! तूं काय केलं असतंस ?

चंदू:—मला त्याचा अनुभव नाहीं. त्यावेळीं मी काय केलं असतं हें सांगण्याइतका निर्भेळपणा आतां माझ्या मनांत राहिला नाहीं.

रेणू:—पुरे झालं. चल आतां.

अरुणा:—थांब, दादा—

रेणू:—कशाला थांब ?

अरुणा:—खरंच. कशाला ! इतक्या वर्षांनीं भाऊ भेटला—

अशा प्रसंगानंतर भेटला म्हणून वाटतं, कीं त्यानं जाऊं नये. पण मग आठवतं, माझी मी मालकीण नाहीं—

( पडद्यांत—वैजनाथ हांका मारित येतो. येतांच दोघे भेटतात. )

अरुणाः—मला असं भेटतां येत नाहीं, नाहीं ग रेणू! लहानपणापासून मी ज्याच्या कडेखांद्यावर खेळलें, त्या माझ्या दादाला मी कडकडून भेटायचं नाहीं! कां?

रेणूः—स्त्री आहेस म्हणून! पहा, अजून त्यांची मिठी सुटत नाहीं! रडताहेत! रडताहेत! पहा, हे पुरुष रडताहेत!—

चंदूः—होय रेणू, आम्हीं रडतों आहोंत. रडण्यांत मोठा आनंद असतो रेणू—( अणिमा येते ) तुम्हां बायकांना तें कळायचं नाहीं. उठल्या सुटल्या—बारीक सारीक दुःखा-साठीं तुम्हीं रडतां. रडण्याचा आनंद तुम्हीं वाजवीपेक्षां फाजिल वापरतां, म्हणून तुम्हांला त्याची किंमत नाहीं. आम्हीं केव्हांतरी रडतों.—आयुष्यांतून एकाददुसऱ्या वेळीं रडतों! म्हणूनच तो आमचा दिवाळी दसरा होतो.

अणिमाः—मी ऐकतें आहें.

चंदूः—खरंच!

अरुणाः—अणू, जीभ ताब्यांत ठेव.

अणिमाः—ही नाकेबंदी फार झाली. तीन वर्षं जीभ ताब्यांत ठेवली त्याचं काय बक्षिस मिळालं?

अरुणा:—अणू–अणू, माझ्याकडे पहा. वैजूसमोर तरी त्याला टाकून बोलू नकोस.

अणिमा:—साऱ्या जगाच्या चव्हाट्यावर उभी राहून मी आतां बोलणार! कुणाचीही पर्वा करणार नाहीं. ऐका. तुमच्या पुरुषी कठोरपणाचा तुम्हांला अभिमान आहे! विचारा या तुमच्या बहिणीला, या तीन वर्षांत मी रडलें का!

अरुणा:—नाहीं. एक टीपसुद्धां गाळलं नाहीं.

अणिमा:—मला दु:ख झालं नव्हतं का?

वैजू:—चंदू, चल, माझ्या घरीं चल.

अणिमा:—तुम्हीं त्यांचे मित्र-आणि मी नव्हे का बालमैत्रीण?—पत्नी नसेन कदाचित्–पण मैत्रीण तरी? तुम्हीं त्यांना भेटलांत–अगदीं कडकडून भेटलांत! मी पाहिलं!—

अरुणा:—अणू, आतां घरांत जा पाहूं. चट्कन् येणं झालं—

अणिमा:—येऊं दे–मी आतां कुणाचीही पर्वा करणार नाहीं.

रेणू:—नाहीं. जा आंत. अजून पर्वा केली पाहिजे. थोडा अवधि आहे. चंदू आमच्या घरीं राहाणार आहे—

अणिमा:—मला तिथं येऊं देशील?

रेणू:—जा पाहूं आतां आंत!

चंदू:—अणू–अणू–( रेणू तिला बळेंच घेऊन आंत जाते. )

वैज:—तूं रेणूच्या घरीं राहाणार?

चंदू:—असं ती म्हणते आहे. तिच्या बाबांनीं तसं ठरवलं आहे.

वैज:—पण तूं काय करणार ?

चंदू:—मी अजून कैदीच आहें. माझे जेलर मला ठेवतील तिथंच मी राहणार !

वैज:—कोण तुझा जेलर ?

चंदू:—तुम्ही प्रत्येकजण !

अरुणा:—दादा, शोभतं का हें तुला ? माझा इलाज का आहे ? खुषीनं का मी तुला घालवतें आहें !

चंदू:—तर मग एक कर. तीन वर्षांचा मला उपास पडला आहे. तुझ्या तोंडचं एक गाणं ऐकीव.

अरुणा:—किती निर्दय आहेस रे ! यावेळीं गाऊं ? तुला असा घरांतून घालवतांना गाऊं ?

चंदू:—हो—घरांतून जातों आहें म्हणूनच. पूर्वी तुझीं गाणीं ऐकत होतों. तीन वर्षं त्यांना पारखा झालों होतों. त्या तुरुंगांतून बाहेर पडलों पण पुन्हा या जगाच्या उघडया तुरुंगांत बंदिवान होणार ! एकच—अगदीं लहानसं—एकच चरण ! म्हण—म्हण—म्हण—

अरुणा:—( हळू हळू गाऊं लागते )

**नाहीं बाला । परदारा । वृथा हा पसारा मी नाचें या कुसंगीं ॥ धृ ॥ गेली गुण-कला । जडलें पतिला । घरींदारीं केवा । कुणाचा कशाला ? ॥ १ ॥**

( ती गात असतां केदारनाथ येतो. मागून रेणू येते. )

केदारः—( चंदूला ) अजून गेला नाहींस ? आणि यावेळीं तुम्हांला गाणं सुचतं ! आम्हीं आलों, कीं तुमचा आवाज बसतो ! वाः रे बायको ! या आमच्या गृहिणी बरं रेणू !

चंदूः—येतों मी. चल वैजू—

अरुणाः—दादा–दादा–अरे मागं वळून तरी पहा रे ! थांब रेणू, तूं तरी जाऊं नकोस–( तिघेंही जातात. )

केदारः—आतां गा–आतां कशी गातेस ती गा ! हं–उघड तोंड. गा–उघड तोंड ! नाहीं तर चाबूक लगावीन ! हं–कर सुरवात !

( अरुणा रडत रडत गात असतां केदारनाथ हसूं लागतो. )

( पडदा )

# अंक दुसरा

( भैयासाहेबाचा दिवाणखाना )

( भैयासाहेब, वैजनाथ बोलत बसले आहेत )

वैजः—मी असा हा वेडापिसा झालों आहें. झाल्या गोष्टीची जबाबदारी माझ्यावर आहे. शिक्षा त्यानं भोगली पण ती मिळाली पाहिजे होती मला ! नुसती शिक्षा होऊन भागलं असतं तरी मला कांहीं वाटलं नसतं— पण आतां सुटून आल्यावरसुद्धां त्याला जी शिक्षा भोगावी लागते आहे, ती पाहून माझं काळीज फाटून जातं आहे.

भैयाः—त्याला कांहीं उपाय नाहीं. ही जगाची राहाटी आहे. मला याची कल्पना होती, म्हणूनच मी एवढा आग्रह धरला आणि त्याला इथं ठेवून घेतलं.

वैजः—संकट तें अजून पुढंच आहे भैय्यासाहेब. हा माधवराव शनीसारखा त्याच्या पाठीस लागला आहे—( स्तब्ध )

भैय्याः—म्हणजे ? आणखी काय झालं आहे ?

वैजः—आणखी एक जुनी केस त्यानं उकरून काढली आहे. आजच मी ऐकलं, ती केस कोर्टांत सुद्धां गेली. हिशेबांत खोडाखोड केल्याचा आरोप आहे. आरोप जुन्या काळचा आहे—पण आज फैलावर आला तर काय होईल कुणी सांगावं ?

भैय्याः—खरं आहे. जुनी शिक्षा आहेच ना पदरीं पडलेली! तिच्या आधारावर ही केस सहज यशस्वी होईल. पुन्हां तुरुंगाची पाळी यायची!

बैजः—मी त्याच दत्ताला भीतों आहें. ही पूर्वीची शिक्षा सैतानासारखी त्याचा पाठपुरावा करणार! कांहींही झालं, तरी त्या आधारावर हे इमारती रचणार. पाया मजबूत आहे कीं नाहीं?

भैय्याः—दुर्दैव बिचाऱ्याचं! ती अणू रोज इथं येते. सारखी बोलत बसते. धन्य आहे त्या पोरीची! असला खट्याळ भाऊ मिळाला असतांही बिचारी अजून टिकाव धरून राहिली आहे.

बैजः—कींव कुणाची करावी हेंच मला कळत नाहीं. दुर्दैवी कोण? ही अणू? हा चंदू? कीं—मीच? कुठली मला बुद्धी झाली! आज गुन्हा कबूल करून तो जर निर्दोषी ठरत असेल तर या क्षणाला मी कोर्टांत उभा रहायला तयार आहें.

भैय्याः—त्यानं कुणाचं कल्याण होणार? तूंही आणखी एक जाशील तुरुंगांत. चंदूचा कलंक आतां केव्हांही धुऊन जाणं शक्य नाहीं.

बैजः—काय करूं?—भैय्यासाहेब—काय करूं? ( चंदू आनंदानें उचंबळलेला येतो )

चंदूः—बस्स! झालं—आतां कुणाची पर्वा नाहीं!

वैजू:—काय झालं ?

चंदू:—ठरलं! जें ठरलं तें आतां करणारच. अणूची एवढी तयारी झाल्यावर आतां मी कुणाच्या बापालाही भीत नाहीं.

भैय्या:—काय झालं रे ? कांहीं तरी अविचार करूं नकोस. ( वैजूला ) त्याला एव्हां सांगूं नकोस !

चंदू:—लग्न ठरलं.

वैजू:—कुणाशीं ? कुणाचं ?

चंदू:—माझं ! अणिमेशीं !

भैय्या:—तें केव्हांच ठरलं आहे. त्यांत आतां नवं काय सांगितलंस ?

चंदू:—तें पूर्वी ठरलं होतं ! पण आतां तें होणार–उद्यां होणार ? ( अणू व रेणू येतात ) विचारा हिला !

अणू:—होय भैय्यासाहेब. उद्यां आर्यसमाजांत जाऊन आम्हीं लग्न करणार.

भैय्या:—असं ? आणि खाणार काय ?

रेणू:—जगाच्या लाथा–दुसरं काय ? इतकं सांगितलं तरी दोघंही माझं ऐकत नाहींत.

अणू:—काय ऐकायचं आतां ? पूर्वी लग्न झालं असतं तर जें कांहीं करणार होतों तें आतां करूं. तेव्हां नसती का भीक मागावी लागली ? तशी आतां मागूं !—

चंदू:—ऐकलंत ? झाली खात्री ?

भैय्याः—खात्री झाली, कीं तुम्हीं दोघंही महामूर्ख आहांत. सुदैवानं जी गोष्ट घडली नाहीं, ती मुद्दाम करून तुम्हीं दोघं बळेंच दुर्दैव ओढून आणणार. असंच ना ?

अणूः—दुर्दैव कशावरून ? आम्हीं सुखी होणार नाहीं कशावरून ?

भैय्याः—मूर्ख पोरांनो, डोळे उघडून जरा पहा. काव्याच्या कल्पनांवर संसार थाटत नसतो. तुझं लग्न झालं, कीं केदार तुला घराबाहेर घालवून देईल—

अणूः—त्या आधींच मी निघेन !

भैय्याः—ठीक, ठीक. त्या आधींच तूं निघशील ! पण खाणार काय ?–आणि कुठं खाणार ? खायला मिळालं तरी रहायला घर हवं ना ?

अणूः—मी नोकरी करणार आहें—

रेणूः—आणि हा घरीं बसून खाणार आहे–जुन्या काळच्या बायकांसारखा !

चंदूः—होय–मी घरीं बसून खाणार आहें–नव्हे–सैंपाक सुद्धां करणार आहें–अगदीं ' गृहिणी 'चीं सारीं कामं करणार आहें. ( रेणू मोठ्यानें हंसते ) हंसतेस काय गाढवी ? तुला खोटं वाटतं ?

भैयाः—खोटं वाटत नाहीं—

चंदूः—मी हिला विचारतों आहें–हिला थट्टा वाटते आहे—

रेणू:—होय—थट्टाच वाटते आहे. चार दिवस नाचशील. पण एक दिवस तुझ्या रक्तांतला पुरुष जागा होईल—समजलास ?—पुरुष जागा झाला, कीं बायकोचे धिंडवडे निघतील ! तूं एक मूर्ख असशील—पण तुझ्यासारख्या लहरी वेडप्यावर विश्वास ठेवणारी ही अणिमा शतमूर्ख आहे.

भैय्या:—खरं आहे. चंदू, रेणू म्हणते तें खरं आहे. भावनेच्या धुक्यावर मनोरे रचतां येत नाहींत. वेड्या मुला, या जगांत एक नि एक दोन, असा हिशेबी व्यवहार आहे ! एका पैचीही अफरातफर इथं खपत नाहीं.

चंदू:—वैजू, तूं का स्तब्ध राहिलास ? तूं बोल ना !

वैज:—उगीच बोलून तुला शीण कां देऊं ?

अणू:—म्हणजे, तुमचंही मत असंच आहे ?

वैज:—काय बोलूं ?—

रेणू:—खरं बोल. एकदां चूक करून त्याचा गळा कापलास ! पुनः तीच चूक करूं नकोस.

वैज:—नाहीं रेणू, ती चूक मी पुनः करणार नाहीं—आणि म्हणूनच मी स्वस्थ राहिलों.

रेणू:—मुळींच न बोलणं म्हणजे खरं बोलणं नव्हे.

चंदू:—खरं आहे. बोल वैजू, अगदीं तुला वाटत असेल तें मन मोकळं करून बोल. आम्हीं लग्न करून संसार थाटायचं ठरवलं आहे. मला नोकरी मिळत नाहीं—हिला

मिळते आहे. हिनं मिळवावं आणि मीं घरीं बसून खावं, असं ठरलं आहे—

वैजः—नको—नको—नको. असं भलतंच कांहीं बोलूं नकोस.

चंदूः—तर काय करूं ?—

भैय्याः—कांहीं पुरुषार्थ दाखीव. मर्दासारखं बोल. बायकोच्या जिवावर जगणार म्हणायला लाज नाहीं वाटत ?

चंदूः—कां वाटावी ? पुरुषांच्या जातीनं माझा अभिमान कुठं धरला आहे ?—

भैयाः—कां ?–मी काय केलं ?

चंदूः—खरं आहे ! क्षमा करा—खरं आहे !—पण जन्मभर मी तुमच्या उपकारांत कां म्हणून राहूं ?

रेणूः—जन्मभर तूं हिच्या उपकारांत कां म्हणून राहणार आहेस ?

चंदूः—ती माझी पत्नी म्हणून !—

रेणूः—तर मग माझ्याशीं लग्न कर आणि घरजांवई म्हणून इथं राहा.

चंदूः—घरजांवई ? तुझ्याशीं लग्न ? तुझ्याशीं ! घरजांवई होण्यासाठीं तुझ्याशीं लग्न करूं !

रेणूः—काय बिघडलं त्यांत ?

चंदूः—( पुटपुटत ) घरजांवई !—घरजांवई ! !

रेणूः—आणि घरनवरा ! हिचा घरनवरा होणार आहेस ना

तूं ? ( डोकें धरून मान खालीं घालतो ) बोल—आतां कां उगी राहिलास ?

भैय्याः—खरंच—रेणू कबूल असेल तर माझीही कबुली आहे.

चंदूः—( वर पाहून ) पण मग या अणिमेचं काय ?

अणूः—इतक्यांत तुझं मन बदललं ? पोटाला मिळतं म्हणून तूं हिच्याशीं लग्न करणार ? यांचा घरजांवई होणार ?

चंदूः—नाहीं अणू ?—तो नुसता तात्विक प्रश्न होता—

अणूः—नाहीं. तूं खोटं बोलतो आहेस. खरोखरच तुला तसं वाटलं. भुकेच्या आगीमुळं उकीरड्यावरच्या पत्रावळींत तोंड घालणाऱ्या भिकाऱ्यासारखी, तुझी बुद्धी भुकेमुळं चळली !—

भैय्याः—अणू—अणू-जीभ आवर—जीभ आवर—

अणूः—काय म्हणून ? कुणासाठीं मी जीभ आवरूं ? 'हा माझा पती' असं हृदयावर कोरून आज इतकीं वर्षं जी मीं मुकी राहिलें, ती यावेळीं सुद्धां जीभ आवरूं ? नुसता जिवाला आधार मिळतो म्हणून वाटेल तिच्याशीं हा लग्नाला तयार होतो—

रेणूः—वाटेल तिच्याशीं नव्हे—माझ्याशीं. तुझ्या इतकाच परिचय—तुझ्या इतकाच सहवास असलेल्या माझ्याशीं !

अणूः—पण तुझं नि याचं लग्न ठरलं नव्हतं !—'हा तुझा नवरा, हा तुझा नवरा,' असं जन्मभर कुणी तुझ्या कानीं-कपाळीं ओरडत नव्हतं. तुला याची दया आली—

रेणू:—( एकदम पण शांतपणें ) नाहीं–अणू, ऐक–याची मला दया आली नाहीं. माझं याच्यावर प्रेम आहे–अगदीं पूर्वीपासून प्रेम आहे. तूं नसतीस तर या पूर्वींच आमचं लग्न झालं असतं—

अणू:—( चंदूला ) हें खरं आहे ?

चंदू:—नाहीं–मला हें कांहींच माहित नाहीं.

भैय्या:—खरोखरच त्याला माहित नाहीं. मला माहित होतं पण मी केव्हांही तें उक्त केलं नाहीं. बाहेर बोलून दाखवण्यांत हशील नव्हतं. त्यांतून कांहींच निष्पन्न होणार नाहीं ही माझी खात्री होती.

अणू:—ठीक, मी जातें तर.

चंदू:—थांब अणू, मी तुला जा म्हटलं का ?

अणू:—परिस्थिती मला इथं लाथ मारते आहे.

चंदू:—नाहीं अणू, परिस्थिती कशीही असली तरी देवाघरीं आपण पतिपत्नी आहोंत. तूंच नाहीं का कबूल केलंस ? निर्भयपणानं आपल्या भावाला उघडउघड तूंच नाहीं का परवां सांगितलंस ? मग आतां कां खचतेस ? मी तुझ्याशीं प्रतारणा करीन असं तुला कां वाटलं ?

अणू:—परिस्थितीमुळं वाटलं—

चंदू:—आग लाव त्या परिस्थितीला !—

रेणू:—त्या परिस्थितीला आग लावतां येत नाहीं. ती परिस्थिती

म्हणजेच पेटलेली आग आहे. आगीला आग लावतां येत नाहीं. ऐक चंदू, माझं बोलणं Seriously घेऊं नकोस. तो माझा तात्कालिक उद्गार होता—

अणूः—पण भैय्यासाहेबही तेंच बोलले—

रेणूः—होय. ती त्यांची चूक होती. म्हातारपणीं माणसाची जीभ ताब्यांत राहात नाहीं—

भैय्याः—पण तूं कां आधीं मला सांगितलंस ?

रेणूः—तरुण मुलांना पोंच नसतो. तुम्हीं भलत्या वेळीं भलतंच बोलून जाल अशी मला कल्पना असती, तर मी माझं रहस्य माझ्याच हृदयांत दाबून ठेवलं असतं.

भैय्याः—पण आतां बोललीस तूंच ना ?

रेणूः—होय. मी आधींच नाहीं का माझी चूक कबूल केली ?

चंदूः—तुझी सहज झालेली चूक खरी—पण तिनं माझ्या भवितव्यावर घाला घातला. अणू, चल, आतां मला इथं राहतां येत नाहीं. ( अणूचा हात धरून एकदम जातो. )

भैय्याः—( तो गेला अशी खात्री झाल्यावर ) वैजनाथ, हें लग्न इतक्यांतच होतां कामा नये. केसची गोष्ट एव्हांच बोलं नकोस—पण कांहीं तरी करून त्याला पुनः इथं घेऊन ये. ( कांहीं न बोलतां तो हळुहळु जातो. भैय्यासाहेब व रेणू क्षणभर स्तब्ध बसतात. ) रेणू, एक गोष्ट तुला माहित असती तर तूं ही चूक केली नसतीस.

रेणू:—आतां चूक होऊन गेली. माझा तोल मला संभाळतां आला नाहीं. भावनेनंच मला दगा दिला.

भैय्या:—चंदूवर आणखी एक नवीन संकट येतं आहे.

रेणू:—आणखी नवीन संकट?

भैय्या:—होय. आणखी एक जुनी केस निघाली आहे. आज ती केस कोर्टांत गेली सुद्धां असेल.

रेणू:—कसली केस?

( अंतोबा आणि विनोबा प्रवेश करतात. )

भय्यासाहेब:—या अंतोबा, या विनोबा. बसा, आज इकडे कुणीकडे?

अंतोबा:—तें असं झालं–तुम्हांला भेटल्यावांचून रहावेना. हकिकत कळली. पण म्हटलं सांगायचं कुणाला? योग्य माणसाशिवाय भलत्या माणसाकडे तोंड उघडण्यांत काय फायदा?

भय्या०:—कसली हकिकत?

अंतोबा:—तो आपला चंदू—मोठा छान मुलगा—मीच लावलं होतं त्याला बँकेंत, पण तो म्हाद्या—

विनोबा:—हो, तो माधवराव कंटक, मोठा बदमाष माणूस.

अंतोबा:—त्या लेकाच्यानं त्या साध्या भोळ्या पोराला तुरुंगाची वाट दाखवली—

भय्या०:—तें मला माहित आहे. आतां सुटूनही आला आहे तो.

अंतोबा: —कसला सुटून आलाय ? पुन्हां चालला कीं तुरुंगांत.

विनोबा:—मोठा वाईट माणूस—तो चंदू नव्हे—माधवराव कंटक. त्यानं आणखी—

अंतोबा:—त्यानं आणखी एक नवा गळफांस केलाय तयार. आजच केस कोर्टांत गेली.

भय्या०:—केस कोर्टांत गेली ?

अंतोबा:—हो. पण तें असं आहे, आतां तो पुराव्याच्या तयारीला लागला आहे. त्यांनीं असं ठरवलंय—आतांच माझ्या कानीं आलं—म्हटलं तुमच्या कानीं घालावं—इथंच होणार आहे सारं कांहीं—

भय्या०:—इथंच ? माझ्या घरीं ?

अंतोबा:—हो तुमच्या घरीं. त्यांनीं असा बेत केलाय, इथंच आणून साक्षी देणारे लोक तयार करायचे. म्हणजे तें असं आहे, बाकीच्या कारकुनांनीं येऊन इथं बोलायचं, तितक्यांत माधवरावांनीं इथं यायचं, त्यांची त्यांची भाषा व्हायची, चंदू असला इथं तर त्याला बोलण्यांत पकडायचं आणि मग तो पुरावा कोर्टांत दाखल करायचा. असा बेत केलाय लेकाच्यांनीं ! म्हणून हा धापा टाकीत आलों—

विनोबा:—हो. मीच ऐकलं. आणि यांना सांगितलं.

अंतोबा:—हो. विनोबानं सांगितलं मला. याला जरा ऐकायला कमी येतं कीं नाहीं, म्हणून ते बोलले याच्यासमोर.

विनोबाः—गाढव कुठले. अगदींच अक्कल नाहीं बेट्यांना.

भय्यासाहेबः—असं आहे का ? मला सांगितलंत तें ठीक केलंत.

अंतोबाः—तेव्हां असं पहा, आम्हां दोघांचं नांव घेऊं नका. अजब माणूस आहे तो माधवराव कंटक !

विनोबाः—गळेकापू आहे बेटा.

अंतोबाः—तूं थांब रे विनोबा, मला बोलूं दे. ते कुणी यायच्या पूर्वींच गेलं पाहिजे आम्हाला. उगीच संशय नको, कशाला जा त्या खाटकाच्या पकडींत. (दिवाकर, मधुकर व बजाबा 'चंदू चंदू' म्हणून हांक मारतात.) अरेच्या, आले वाटतं ते ? छे: ! आतां कांहीं जातां येत नाहीं. पण हें पहा भय्यासाहेब, तुम्हीं कांहीं बोलूं नका—आम्हीं कांहीं बोलणार नाहीं. संधी सांपडली कीं आम्हीं काढता पाय घेऊं. उगीच या भानगडींत गुंतून जायला नको. (दिवाकर मधुकर आणि बजाबा येतात.)

भैय्याः—या मंडळी—बसा. चंदू आतांच बाहेर गेला आहे. इतक्यांत येईल. बसा. रेणू, चहा घेऊन ये पाहूं. (रेणू जाते.) ठीक. काय खबर ? हवापाणी ठीक ! ऑफिसं काय म्हणतात ?

बजाबाः—ऑफिसं काय म्हणणार ? दहा वाजतां उघडतात—सहा वाजतां बंद होतात. मधें चहाची सुटी. कुणाला अर्धातास, कुणाला एक तास. या दिवाकरसारख्या बँकेंतल्या कारकुनाला मात्र कांहींच ताळतंत्र नाहीं.

अंतोबा



अ. ह. गद्रे

दिवाकर



फोटो—किरण कलामंदिर

गजानन परचुरे

बजाबा



रमेश नाडकर्णी

मधुकर



गणेश जुवेकर

दिवाकरः—मुद्दाम अशासाठीं आलों होतों भैय्यासाहेब—

भैय्याः—मला माहित आहे. आज खटला गुदरला ना ?

दिवाकरः—एकूण तुमच्यापर्यंत बातमी पोंचली ?

मधुकरः—मोठा पेंच आला आहे.

बजाबाः—यांच्या बँकेशी माझा संबंध नाहीं म्हणा—पण माझी साक्ष निघणार आहे. मी ऑडिटरचा क्लार्क या नात्यानं तपासणीला गेलों होतों ना ?

मधुकरः—मोठं संकट आलं आहे.

दिवाकरः—सुटण्याची कांहीं आशा दिसत नाहीं. माधवराव कॅशियरनं धागेदोरे कसे जाम बांधून टाकले आहेत. ( अरुणा घाईघाईनें येते. ) मला वाटतं पुनः दोनतीन वर्षं—

अरुणाः—दादा कुठं आहे ? भैय्यासाहेब, माझा दादा कुठं आहे ?

भैयाः—आतांच गेला.

अरुणाः—कुठं गेला ?

भैयाः—तेंच पाहायला मी वैजनाथला पाठवला आहे.

अरुणाः—जिवाचा वैताग आला आहे ! नवरा नव्हे हा—

भैयाः—थांब. हे परके लोक इथं आहेत.

अरुणाः—असूंदेत. मला कुणाची पर्वा नाहीं आतां. भावाचा गळा कापायला खुद्द नवराच तयार झाला तर बायकोनं कुणाची तरफदारी करावी, हें तुमच्यांतला कुणी सांगेल का ?

बजाबा:—नवरा म्हणजे नवरा ! तिथं अपील नाहीं. माझी बायको माझ्याविरुद्ध जाऊन भावाला सामिल झाली तर मी तिला उभी चिरीन.

अरुणा:—आणि तुम्ही हो ?

दिवाकर:—काय सांगावं ? परिस्थितीवर सारं अवलंबून असतं. केव्हां असं वागावं लागेल, तर केव्हां तसं वागावं लागेल. एकूण काय, वारा वाहील तशी पाठ दिली पाहिजे.

अरुणा:—आणखी तुमचं काय मत आहे ?

मधुकर:—माझं अजून लग्नच झालं नाहीं.

अरुणा:—भाग्यवान् आहांत. माझं ऐका—लग्न करूं नका. कुणा तरी गरीब बिचाऱ्या पोरीच्या जन्माचं मातेरं करूं नका. माझ्याकडे पहा—मी निर्लज्ज झालें आहें. तुम्हीं कुणी ओळखीचे नसतांही तुमच्याबरोबर जिव्हाळ्याच्या गोष्टी बोलतें आहें—वेड्यासारखी बोलतें आहें. कां ? कळलं ? माझं लग्न झालं आहे—मला एक नवरा आहे—आणि मला एक भाऊही आहे ! तो भाऊ परवांच तुरुंगांतून सुटून आला आहे—आणि त्याला पुनः तुरुंगांत डांबून टाकावा म्हणून माझा नवराच जीव टाकतो आहे. आतां सांगा—

सर्व:—चंदूची बहीण !

अरुणा:—होय. चंदूची बहीण ! पण केदारनाथाची बायको—पत्नी—दासी !—गुलाम ! ! ! गुलामाहून गुलाम म्हणजे

करडया नवऱ्याची बायको ! ( गाऊं लागते )

**कुलांगना कलंकिता सुखातुरा । वर-जाया जगिं व्हाया । वरि परकि नर-करा । तो बनत धनि । ती फिरत वनिं । अनुगत पतिला विलपत निशि-दिनिं ॥धृ०॥ अविरत विनिमय हा छळि जगता । त्या नर-निरता रडवित दयिता । कृतांत निज करिं कसा न परिहरि ॥ १ ॥**

( ती गात असतां विनोबा आणि अंतोबा हळुच निघून जातात. रेणू येते आणि हातांत चहाची ट्रे घेऊन तटस्थ राहाते. )

रेणू:—अरुताई !

अरुणा:—अरूताई मेली ! इथं आहे ही केदारनाथाची बायको.

भैया:—अरू, बाळ, शांत हो, शांत-हो. तुझं मन मला दिसतं-पण पोरी, त्याला उपाय नाहीं. आपला समाजच असा आहे. आमची जातच मोठी वाईट—ऐकलंत बाबांनो, आमची जातच मोठी वाईट. नोकरीशिवाय आम्हांला दुसरा स्वर्ग वाटत नाहीं-पटत नाहीं. ऑफिसांत साहेब आम्हांला लाथ मारतो आणि घरीं येऊन त्याचा राग आम्हीं बायकोवर काढतों. तिचे साहेब आम्हीं होतों—त्याचा हा परिणाम.

दिवाकर:—आम्हीं जातों आतां.

भैया:—थांबा. कां आलां होतां ?

दिवाकर:—चंदूला भेटायला. म्हटलं त्याला वर्दी द्यावी—

मधुकर:—तें असं झालं आहे—( माधवराव येतो. ) अरे बापरे !—

माधव:—दिवाकर–मधुकर, इथं काय आहे तुमचं काम ?

दिवाकर:—नाहीं–सहज भैय्यासाहेबांना भेटायला—

रेणू:—इथं तुमचं काय आहे काम ?

माधव:—मी सरकारी कामासाठीं आलों आहें. चंदू कुठं आहे ?

अरुणा:—तुम्हीं कोण आहांत ? पोलीस इन्स्पेक्टर ? बेलीफ ? कॉन्स्टेबल ? चालते व्हा इथून.

माधव:—अरुणाबाई, या कामांत तुम्हीं तोंड घालूं नका. हें घर तुमचं नव्हे. हें घर—

रेणू:—माझं आहे. चालते व्हा पाहूं इथनं !

माधव:—नाहीं–भैय्यासाहेब !—

भैय्या:—हें पहा माधवराव, पोरांबाळांपुढं बापाचं कांहीं चालत नाहीं ! ही माझी मुलगी आहे जरा फाजिल—मलासुद्धां आवरत नाहीं. मी हा असा म्हातारा–एकुलती एक मुलगी–तिचा हट्ट पुरवावा लागतो—

रेणू:—निघा पाहूं इथून—

माधव:—दिवाकर !–मधुकर !—आधीं बाहेर व्हा. नोकरीची पर्वा आहे कीं नाहीं ?

अरुणा:—ते एव्हां यायचे नाहींत. ( आंत वैजनाथ:—आला परत—भैय्यासाहेब, आला परत. ) कोण ?

वैज:—( प्र. करून ) चंदू आला—मी त्याची समजूत घातली. अणिमाही आली.

माधव:—अणिमा आली ? इथं ?

वैज:—कोण ? तुम्हीं ?

माधव:—होय ! मी ! बरे सारे एके जागीं सांपडलांत ! आतां सर्वांचेच जाब घेतों. ( चंदू व अणिमा आंत येत असतां रेणू माधवरावाला लोटून बाहेर घालवते. )

माधव:—( जातां जातां ) याद राखून ठेवा. याचा सूड घेईन तरच नांवाचा माधवराव कंटक ! ( बाहेर पडतो. )

रेणू:—जा रे ग्रामकंटक ! नांवाचा म्हणे ! मेलेल्याला काय आणखी मारणार आहेस ?

चंदू:—कोण ? दिवाकर–मधु–बजाबा, बरी तुम्हांला माझी आठवण झाली ?

दिवाकर:—बाबारे, ही आठवण उगीच नाहीं. तुझ्यापायीं आमच्या गळ्याला फास लागतो आहे. ती एक खोडाखोड केली होतीस ना ?

चंदू:—कुठली खोडाखोड ?

बजाबा:—वा: ! इतक्यांत विसरलास ? ऑडिट करतांना माझ्यापाशीं कबूल केलंस—

चंदू:—केव्हां ?

मधु:—तुरुंगांत जाऊन बदमाष झाला बेटा !

अरु:—कुणाला म्हणतोस बदमाष ? माझ्या दादाला ?

दिवा:—धडधडित नाकबूल करतो !

चंदू:—पण काय ?

बजाबा:—आठवत नाहीं ? आंकडा फिरवलास तो–खरडलंस–चाटलंस–चाकू चालवलास ! मवाली !–बदमाष !

चंदू:—हे माझे मित्र !

दिवा:—म्हणजे ?–अजून कबूल करायचं नाहीं ! माझ्या ताब्यांतलीं लेजर्स ऑफिस बंद होतांना मागून घेतलींस ! खरडलींस ! चाटलींस ?

भैय्या:—माझ्या मित्रांनो, आतां तुम्हीं जाल इथून. तुमचा कावा मला कळला. असले बनाव बनवून साक्षीपुरावा तयार करण्याची जागा ही नव्हे—Get out–Kick them out–रेणू Kick them out ! ( तिघेही पळतात ) ये अणू, गेला तुझा राग ? ही पहा अरू इथं आली आहे.

अणू:—क्षमा करा–माझी चूक झाली ! रेणू—

रेणू:—उगी उगी–ऐकलंस अरूताई, अणू आतां इथंच राहणार आहे. होय ना ?

अरू:—अणूवन्सं, तूं इथं राहाणार ? इथं ? आणि मी तिथं काय करूं ? एकटीच—दादा, मी तिथं एकटीच राहूं ?

चंदू:—तूंही इथं ये.

अरू:—तुझं डोकं ताळ्यावर आहे ? मी नवऱ्याची बायको आहें. मला घराबाहेर निघायला—हळदीकुंकवाला जायलासुद्धां आगाऊ परवानगी घ्यावी लागते, ती मी इथं कायमची येऊं ? लाज नाहीं वाटत तुला ? मी तिकडे एकटी असतांना, व्रात्य पोरी, तूं इथं येऊन राहाणार ? चल–चल–चल निघ माझ्याबरोवर ! यावेळीं माझा नवरा माझ्या अंगांत संचारला आहे—

केदार:—( प्र. क. ) नाहीं. हा पहा मी इथं आहें. वाः रे बायको ! मी घरीं नाहींसा पाहून पळून आलीस होय ? ही आमची सहधर्मचारिणी बरं भैय्यासाहेब ! वाः ! वाः ! ! ऑफिसची वेळ विसरलीस. नाहीं ? पहा रेणू–पहा भैय्यासाहेब, तुम्हीं वडील माणूस आहांत. तुम्हीच सांगा–तुम्हींच न्याय द्या, पत्नीला हें शोभतं का ?

चंदू:—माझी बहीण तुझ्या घरीं येणार नाहीं.

केदार:—Shut up, you gaolbird !

चंदू:—Shut up, you office-worm !

भैया:—हां–हां–चंदू, हें काय ?

वैज:—चंदू–चंदू–माझ्याकडे पहा ! माझी मान–माझा प्राण–यांच्या हातीं आहे. यांना कळलं आहे.

केदार:—( अरूला ) चल–चल–घरीं–

चंदूः—नाहीं—मी जाऊं देणार नाहीं. माझ्या मुडद्यावरूनच जावं लागेल तुम्हांला !

अरूः —नाहीं दादा, सोड माझा हात !–ते माझे पती आहेत. त्यांच्यावांचून मला गत्यंतर नाहीं ! ( चंदू हात सोडतो. )

केदारः—वाः रे बायको ! च ऽऽऽ ल् ! आतां कशी निघाली !

( मोठ्यानें हंसत तिला ओढून नेतो. )

( सर्व स्तब्ध )

अणूः—( एकदम किंचाळून ) नाहीं—नाहीं—मी लग्न करणार नाहीं !

रेणूः—शाबास–अणूताई -शाबास !

भैयाः—अरेरे–हीं आमचीं लग्नं !

चंदूः—काय करूं ? वैजू, काय करूं ?

( दोघे मिठ्या मारतात )

( पडदा पडतो. )

# अंक तिसरा

( केदारनाथाचा दिवाणखाना )

( केदारनाथ व माधवराव बोलत आहेत )

माधवः—आतां सर्व कांहीं जमून आलं आहे. आतां फक्त तुमची साक्ष तेवढी पाहिजे, कीं या वैज्याच्या हातांत देखील बेड्या ठोकतों. हरामखोर माझी बदनामी करीत गांवभर हिंडतो आहे—याची चाड तुम्ही धरली पाहिजे. तुमचं आमचं आतां नातं जुळणार—ते तुम्हीच जर असे कच खाऊं लागलांत तर माझी अब्रू कोण सांवरून धरणार?

केदारः—खरं आहे—खरं आहे ! पण त्या पोराची मला दया येते. त्यानं माझं कांहींच वाईट केलं नाहीं, त्याला काय म्हणून फांस लावूं? चंदूची गोष्ट निराळी होती—तरीही त्याच्या बाबतींत वैजूशीं संबंध येतो. उद्यां जग मला नांव ठेवील. एक गेलाच आहे—दुसऱ्यालाही या केदारानं तुरुंगांत लोटला म्हणतील—

माधवः—असा भित्रेपणा करून कसं चालेल. समजा, तुम्हीं या बँकेचे कॅशिअर असतां, तर काय केलं असतं?

केदारः—खरं आहे, पण मन कसं मागंपुढं होतं—

माधवः—तुम्हीं स्वतः कॅशिअर असतां तर तें तुम्हांला कबूल आहे—पण माझ्यासाठीं—हो, या माधवरावासाठीं नुसती साक्ष

देणं तुमच्या जिवावर येतं ? आणि ते हे तुम्हीं मला आपला मेव्हणा करणार !

केदार:—असं तोडून बोलूं नका माधवराव. कांहीं लोकापवादाची चाड पाहिजे ना ? उद्यां तुम्हींच लोक मला नांवं ठेवाल. प्रत्यक्ष बायकोच्या भावाविरुद्ध साक्ष द्यायची—

माधव:—चुकतां आहांत. मी तुम्हांला वैजनाथविरुद्ध साक्ष द्यायला सांगतों आहें—

केदार:—पण पर्यायानं ती साक्ष चंदूच्या विरुद्ध होणार कीं नाहीं ? चंदू असं असं बोलला, हें मी कोर्टांत उभं राहून सांगायचं ! कठिण—कठिण—फार कठिण ! ती तर मला तोंडसुद्धां उघडूं देणार नाहीं—

माधव:—शिस्तीच्या बाबतींत एक करडे गृहस्थ म्हणून तुमचा जो लौकिक आहे, तो खरा आहे असा माझा समज होता—

केदार:—शिस्त म्हणजे शिस्त, तिथं दयाक्षमा नाहीं—

माधव:—मग आतांच चंदूची—नव्हे वैजूची दया कां आली तुम्हाला ? चंदू तसं बोलला, वैजूनं चेक बनावट तयार केला हें तुमच्यासमोर तो बोलला, हें खरं ना ? ठीक. आतां तेवढंच कोर्टांत सांगा. नाहींतर माझ्यापाशीं असं बोललांत असं मीच अफिडेविट करीन आणि तुम्हांला कोर्टांत खेंचायला लावीन. माझी खात्री आहे, पिंजऱ्यांत

अ. भा. म. ग्रा., पाचनालय नाशिक.
पा. क्र. १८५३ नों. दि ...
वि. नाट्य. ...

उभं राहिल्यावर खोटं बोलायची तुमची छाती नाहीं. येरझाऱ्या कसल्या घालतां? ही सरळ सरळ बाब आहे! स्वस्थ बसा आणि होय म्हणा! (अरुणा येऊन मागें उभी राहते. केदार तिला पाहातो. माधव पहात नाहीं.) ऐकलंत? होय म्हणा. त्यांतच तुमचा मोठेपणा आहे. चंदूचं काय—तो आतां पुनः तुरुंगांत गेलाच आहे; वैजूही त्याच्या बरोबर गेला तर एकमेकांना सोबतच होईल. गंमत करतील दोघेही तुरुंगांत! मग? घालूं तुमचं नांव साक्षीदाराच्या यादींत?

अरुणा:—वैजू तुरुंगांत? (माधवराव दचकतो) काय म्हणून?

केदार:—घरांत जा पाहूं!

अरुणा:—काय म्हणून? मी इथं कुणीच का नाहीं? विचारायचा मला अधिकार नाहीं?

केदार:—नाहीं!

अरुणा:—नाहीं? नाहीं?? नाहीं???–कां नाहीं?

केदार:—घरांत जा. चलो! चलो!!

अरुणा:—कोण आपण? पोलीस शिपाई? 'चलो' कुणाला म्हणतां? ही शिपाईगिरी केव्हांपासून पत्करली?

केदार:—तुझा भाऊ बदमाष ठरला, तेव्हांपासून? जास्त बोलायचं काम नाहीं. नीघ पाहूं इथनं. इथं खासगी कामं चाललीं आहेत. आपला त्यांच्याशीं कांहीं संबंध नाहीं.

अरुणा:—संबंध कसा नाहीं? माझ्या भावाच्या गोष्टी चालल्या

आहेत. त्याच्या मित्राला–माझ्या त्याही भावाला तुरुंगांत लोटायच्या गोष्टी तुम्ही बोलतां आहांत, हें प्रत्यक्ष ऐकत असूनही मी इथनं जाऊं काय म्हणून ?

केदारः—मी हुकूम करतों म्हणून. परक्यादेखत जास्त शोभा करून घेऊं नकोस.

अरुणाः—आतां आणखी कसली शोभा व्हायची राहिली आहे ? व्हायचे तेवढे सगळे धिंडवडे होऊन गेले आहेत. सांगा–त्रैजूवर कसलं किटाळ आणतां आहांत ?

माधवः—( शांतपणें ) असं पहा वहिनी, हीं सरकारी कामं आहेत. गृहिणीनं घरापुरतं पाहावं. बाहेरच्या–घराबाहेरच्या गोष्टींत गृहीणीनं मन घालूं नये.

अरुः—तिच्या स्वत.च्या भावाच्या जिवाशीं बेतली तरीही ?

केदारः—हो–हो–तरीही ! भाऊ म्हणे भाऊ ! माझा भाऊ असा असता, तर मी त्याचं श्राद्ध करून मोकळा झालों असतों.

अरुः—आणि नवरा असा असता तर ?

केदारः—( किंचाळून ) चूप–हरामखोर बायको ! उभी चिरीन. तोंड वर करून मला उत्तरं देते ! मला ? मला नवऱ्याला ! ! !

माधवः—वहिनी, जा पाहूं आतां. उगीच आगींत तेल कां ओततां ?

अरुः—आग विझवायला पाणी सांपडलं नाहीं—जवळ तेलाचं भांडं दिसलं—भडकलेलं मन, कळलं नाहीं—दिलं ओतून. आग भडकेल ? भडकूं दे ! एरव्हीं तरी कुळचाभर पाण्यानं ती थोडीच थंड होणार होती !

केदारः—थंडपणें बोलते आहे ! मी एवढा संतापलों असतां तुला थंडपणा सुचतो आहे ! काय करूं माधवराव, खून करणं हा गुन्हा नसता तर या वेळीं हिचा मुडदा पाडला असता !

अरुः—मग लावा ना माझ्या गळ्याला नख ! माधवराव आपले दोस्त आहेत ! ते आपल्या विरुद्ध साक्ष द्यायचे नाहींत. मी मेलें म्हणजे खुशाल माझ्या भावाला फांसावर चढवा. ( अणिमा येते ) आलीस ? ये. यांच्या गळीं पड. चंदूला वांचवायचं असलं—वैजूला वांचवायचं असलं—तर यांच्या गळीं पड.

अणूः—वैजूला ?

अरुः—हो—वैजूला !

अणूः—वैजूनं काय केलं ?

अरुः—काय केलं तें तुला माहित आहे. यांनीं तें यांनाही सांगितलं. आतां हे साक्ष देणार आहेत ! चंदू तर गेलाच आहे—पण आतां वैजूही तुरुंगाची वाट धरणार. हे त्याचे वाटाडे ! होय ना हो ! म्हणून म्हणतें—यांचे पाय धर,

मग हात गळ्यांत टाक, नंतर यांच्या शेजेची सावित्री हो—
आणि चंदूचे प्राण या यमापासून मागून घे.

अणूः—( केदाराला ) होय दादा ? ( स्तब्ध ) होय म्हणायला तुम्हांला धीर होत नाहीं ! हे तुम्हीं पुरुष ! भ्याड ! भेकड ! !

केदारः—चूप !

अणूः—कां ' चूऽऽप ' ! ! प्राणावर बेतली तरी आरोळीसुद्धां मारायची नाहीं ? कां ? मी गुलाम आहें ? गुलामालासुद्धां असली बंदी नसते !

केदारः—अणू, बऱ्या गोष्टीनं घरांत जा.

अणूः—घरांत जाऊं ? मग याचं काय ? हे मला घराबाहेर काढायला आले आहेत ना ?

केदारः—काय करूं ? काय करूं ? अशी नाकेबंदी केली आहे या बायकांनीं ! माधवराव, चला, आपणच बाहेर जाऊं—( खुंटीवरची कोटटोपी काठी घेऊन माधवरावाला ओढीत नेतो. )

माधवः—( जातां जातां ) पण आधीं तें अफिडेविट—(जातो)
( एक क्षणभर सर्व स्तब्ध. )

अरुः—अणूवन्सं, रडते आहेस ?

अणूः—नाहीं. रडायचा प्रयत्न करतें आहें पण मेलं रडूंच येत नाहीं. डोळ्यांच्या खळ्या कशा रुक्ष होऊन गेल्या आहेत ! असं वाटतं, रक्त तरी येईल या डोळ्यांवाटे !

अरु:—नाहीं अणू, रक्ताचा सडा असा पडत नसतो. जगांतलीं रणकंदनं कशीं असतात तीं आम्हां चुलफुंक्या बायकांना कळायचीं नाहींत; पण हीं आमचीं घरगुती रणकंदनं रक्तपात केल्याशिवाय जीव घेतात—नव्हे जीव घेतल्याशिवाय ठार मारतात.

अणू:—खरंच. यापेक्षां मरण तें आणखी काय असायचं? चालतंबोलतं धड म्हणजेच कांहीं माणूस नव्हे! ( रेणू येते. ) ये रेणू, सांग, मेलेलं जिवंत माणूस तूं पाहिलं आहेस?

रेणू:—( रुक्ष दृष्टीनें ) होय. पाहिलं आहे—आरशांत पाहिलं आहे!

अरु:—आरशांत?

अणू:—आरशांत!! खरं आहे. आतां डोळ्यांनीं पहा—हे दोन जिवंत मुडदे डोळ्यांनीं पहा. आतां सांग—तुला काय वाटतं?

रेणू:—काय वाटायचं? काळीजच करपलं, तिथं वाटायला ठाव कुठं राहिला? अणू, माझी चूक झाली. न बोलायची गोष्ट मी काल बोलून गेलं. तेव्हांच मला मृत्यु आला—तेव्हांच माझा मीपणा नाहींसा झाला.

अरु:—( बजावून ) अशी मरणाची कळा आणून चालायचं नाहीं पोरींनो! अशा आयत्यावेळीं खचलांत तर 'अबला' ठराल! ही कुस्ती सुरू झाली आहे. हे पेंच सांभाळले पाहिजेत—नाहींतर जमिनदोस्त व्हावं लागेल.

रेणू:—खरं आहे. मी खचलें होतें—

अरुणा:—खचून चालायचं नाहीं. धीर धरायची वेळ हीच आहे. पण काय करायचं ? आम्हीं बायकांनीं काय करायचं ? पुरुषांना अद्दल घडवायचं कोणतंच हत्यार आमच्या हातीं नाहीं.

रेणू:—They are masters of the situation !

अरुणा:—काय म्हटलंस ?

रेणू:—म्हटलं, सत्ता त्यांच्या हातीं आहे.

अरुणा:—मी ठरवलं आहे—दादा पुनः तुरुंगांत गेला तर मी हें घर सोडणार !

अणू:—तूं ? तूं वहिनी ? कां ?

अरुणा:—जसा दादा तशीच मी. त्याच्या स्पर्शानं घर विटाळतं !—तो तशीच मी !—

रेणू:—पण तूं गुन्हा केला नाहींस !

अरुणा:—आतां करीन. यांची बदनामी करण्यासाठीं मी स्वतः कोर्टांत उभी राहीन. बनावट चेक मी वटावला म्हणून सांगेन. मला बचावण्यासाठीं दादानं तें बालंट आपल्या आंगावर ओढून घेतलं म्हणून सांगेन.

अणू:—मला हें सुचलं नाहीं !

अरुणा:—होय ना ? कां ? कळलं ? तो माझा भाऊ आहे.

एका आईच्या उदरांतून आम्हीं जन्माला आलों आहोंत. एका रक्ताच्या मातींतून आमचे देह घडले गेले आहेत.

अणू:—आणि मी ?

रेणू:—अणू, हा प्रश्न तूं विचारूं नयेस. या प्रश्नाचं उत्तर आधींच मिळालं आहे!

अणू:—आधींच ? तें केव्हां ?

रेणू:—दादासाठीं अरुताई कोर्टांत उभी राहायला तयार झाली—नव्हे तुरुंगांत जायला तयार झाली. कुणासाठीं ?—दादासाठीं! केदारनाथांसाठीं नव्हे. केदारनाथाचं घर टाकायलाच ही तयार झाली. कुणासाठीं ? भावासाठीं! कुणाला ? नवऱ्याला!—साऱ्याच बहिणी अशा असतील का ?

अणू:—माझ्याकडे पहा! मी भावाला टाकायला तयार झालें, कुणासाठीं ? चंदूसाठीं. त्याचं माझं रक्ताचं नातं आहे का ? नाहीं ना ? ही बहीण अशी—आणि मी ही अशी! कां ?

अरु:—लग्न झालं नाहीं म्हणून. लग्न झालं असतं—दादाचा नवरेपणा चाखला असतास—म्हणजे काय केलं असतंस ?

अणू:—अन् त्यानं नवरेपणाच गाजवला नसता तर ?

रेणू:—अन् पुरुषानांच मुलं होऊं लागलीं असतीं तर!—ते घरीं राहिले असते—आम्हीं ऑफिसांत गेलों असतों. वेडी आहेस अणू!

अणू:—अन् तूं शहाणी आहेस ?

रेणू:—नाहीं—मी तर महामूर्ख आहें. तुला कांहीं कळत नव्हतं —मला सर्व कांहीं कळत होतं. कळून सवरून देखील मी खाईत उडी टाकायला तयार होत होतें—

अणू:—खरंच—मला तें सुचलं नाहीं; हिला सुचलं. रक्त बोललं! नव्हे; रक्ताला वाचा फुटली! मग प्रेम म्हणजे काय?

रेणू:—प्रेम म्हणजे कांहींही असो—पण प्रेम म्हणजे लग्न मात्र खास नव्हे. हिच्याकडेसच पाहा, लग्न झालं आहे, पण जीव टाकते भावासाठीं—

अरु:—अन् हिच्याकडे पहा—लग्न झालं नाहीं, पण भाऊ टाकते कुणा परक्यासाठीं! कोडं—कोडं! हें जग म्हणजे एक कोडं आहे.

रेणू:—कशालाच कांहीं नियम नाहीं. ही अशी कां—आणि ही अशी कां—हें कोण सांगेल?

अणू:—आतां हीं 'कां' पुरे झालीं. पुढं काय करणार? त्याला कसा वांचवणार? वैजूला कसा वांचवणार?

अरु:—त्याची काळजी तुम्ही करूं नका. एका खड्यानं मी दोन पक्षी मारणार आहें. एक—दादाचा बचाव आणि (दांत ओंठ खाऊन) दुसरा—त्यांचा पाडाव—त्यांची बदनामी!—त्यांचं घर मला कोसळून घालायचं आहे!

रेणू:—अरुताई—अरुताई—

अरुः—आतां अरुताई मेली ! आतां ही खवळलेली वाघीण भावाच्या अब्रूसाठीं वाटेल त्याचा चावा घेणार ! ( चंदू येतो. ) ये दादा–

चंदूः—( हंसत ) कोण कुणाचा चावा घेणार ?

रेणूः—सारींच साऱ्यांचे चावे घेताहेत, तिथं नांवानिशी कुणाची सांगायची ?

चंदूः—असं पहा–आतां थोडेच दिवस राहिले आहेत. या थोड्या दिवसांसाठीं कुणी कुणाचे चावे घेऊं नका. मजेंत दिवस घालवूं या. म्हणूनच ना इथं आलों ? म्हटलं, मेव्हणे–महाराज घरीं असले तर बखोटीला हात घालायचे. पण वेळ चांगली दिसते. ते इथं नाहींत—

अरुणाः—पण इतक्यांत आले तर !

चंदूः—तर त्यावेळचं त्यावेळीं. आतां नाहींत ना ते ? छान ! पुढच्याचा विचार करण्याइतका पुढं वेळ राहिला नाहीं. एकेक घटका भरत आली आहे. काळाचं जाळं कसं छान विणलं गेलं आहे. फांस खेंचायचं त्याचं काम सुरू झालं आहे. घटकाभऱ्यानं या उघड्या जगाचे दरवाजे बंद होऊन मी माझ्या माहेरघरीं जाणार आहें. हा एवढाच सुखाचा क्षण आपण गंमतींत घालवूं. रेणू , तूं सुद्धां अशी हिरमुस-लेली ? अग, हा उघड्या जगाचा सासुरवास संपवून मी

माहेरीं जाणार आहें—मला निरोप द्यायच्यासाठीं एकदां हांस पाहूं ! आणि तूं ग ए गाढवी,—

अणू:—कोण गाढवी ? मी ?

चंदू:—गध्यासारखा मी बोलतों आहें—त्यावरून गाढवी कोण तें कळत नाहीं ? अगदींच गाढवी आहेस !

अरुणा:—आणि मी रे दादा ?

चंदू:—तूं ? ( मोठमोठ्यानें हंसतो ) तूं गाढवी होतीस ! पूर्वीं होतीस ! पण आतां तूं शहाणी झाली आहेस. शहाण्याची बायको शहाणी ! कुंभाराची जशी कुंभारीण, तेल्याची जशी तेलीण, महाराची जशी महारीण, तशीच शहाण्याची बायको शहाणी ! तुला कोण गाढवी म्हणेल ?

अरुणा:—ऐक, रेणू ? ऐक, अणू, आतां सांग. मघांच्या प्रश्नाचं उत्तर आतां सांग.

अणिमा:—खरं आहे–( मट्कन बसते. )

अरुणा:—अणू , खचलीस ?

चंदू:—काय झालं ?

रेणू:—कांहीं नाहीं. या बायकी गोष्टी आहेत. पुरुषांनीं मन घालण्या इतक्या महत्त्वाच्या नाहींत.

चंदू:—तुरुंगांत जायला निघालेल्या पुरुषांनीं सुद्धां ?

रेणू:—हो–हो तुरुंगांत जाणारांनीं सुद्धां—म्हणजे तुरुंगांत जाणाऱ्या पुरुषांनीं सुद्धां ! काय फरक आहे त्यांत ?

आपण सारीं कसल्या ना कसल्या तरी तुरुंगांतच आहोंत कीं नाहीं? काय फरक आहे पुरुषांत आणि बायकांत?

चंदू:—नाहीं?

रेणू:—नाहीं. ज्याला वाटतं कीं आपण तुरुंगाबाहेर आहें, तो दुसऱ्याला तुरुंगांत लोटायला पाहात असतो. पण त्या वेड्याला हें माहित नसतं, कीं बाहेर कोण आहे नि आंत कोण जातो आहे! जरा आगेंमागें पाहिलं, कीं त्यालाच कळून येतं, कीं आपणच तुरुंगांत आहोंत आणि ज्याला तुरुंगांत घातलं असं आपण समजतों, तो त्या तुरुंगाबाहेर निसटून गेला आहे—नव्हे आपणच बाहेर घालवला आहे.

चंदू:—अस्सं! वेदांताचीं कुठलीं पुस्तकं वाचते आहेस? तुझा ऐच्छिक विषय काय आहे? Philosophy?

रेणू:—नाहीं. Geology! मी दगडाचं शास्त्र शिकत असतें म्हणूनच मला कळलं हें. Philosophy त काय आहे? दगड! मूर्खांना अधिक मूर्ख बनवण्यासाठीं Philosophy निर्माण केली आहे.

चंदू:—जळो ती फिलॉसफी! एकेक क्षण कसा काळझांपे-सारखा पळतो आहे. मी तुरुंगांत जाणार! आज सारं कांहीं झालं. उद्यां मला शिक्षा सुनावणार! आतां किती शिक्षा एवढंच ऐकायचं राहिलं आहे. तेवढं ऐकण्यापूर्वीं—
( स्तब्ध )

अणू:—तेवढं ऐकण्यापूर्वी काय ?

चंदू:— तूं होय ! तूं ऐकत होतीस वाटतं ? ( मोठ्यानें हंसतो ) आणि ही माझी छोटी बहीण पण ऐकत बसली आहे. मोठी करमणूक झाली तुमची, नाहीं ? आतां थोडी माझी करमणूक करा. ऐकलंस अरू, तुरुंगाचं अवजड कवाड बंद होण्यापूर्वी मला एक—

अणू:—गाणं ऐकीव ! होय ना ?

चंदू:—कसं छान बोललीस. आतां अशी छान गाशील अरू !

रेणू:—खरं आहे. दुःखानं गळा दाटला कीं गाण्याला आवाजी चांगली लागते. तापांत असा अनुभव येतो खरा !

अरू:—( कावलेल्या काळजानें ) ऐक—ऐक—गाणं ऐक ! चांडाळा, बहिणीच्या जिवाचे वाभाडे निघत असतां गाण्याला हपापलेल्या मांगा—ऐक माझं गाणं ! ( पहिल्या अंकांतील शेवटचें गाणें म्हणते. ती गात असतां सर्व खालीं मान घालून स्वस्थ असतात. गाणें संपतांच ती वेड्यासारखी हंसू लागते. ) ऐकलंत ? किती छान गायलें—किती छान गायलें ! ! कुणी कधीं ऐकलं होतं असं गाणं ? झाला आत्मा थंड ? काय रे दादा, बोल ना ? झाला आत्मा थंड ?—( थकून खुर्चीत पडते. )

चंदू:—ताई, अरुताई, बाळ अरू, क्षमा कर. या स्वार्थी भावाला क्षमा कर. तूं माझी पाठची बहीण—मी तुझं

सांत्वन करायचं–तो सांत्वनासाठीं उलट तुलाच कष्ट देतों आहें. पण अरू, पुरुष मूर्ख असतो. स्त्री त्याची आई–समजलीस ? आई ! मग ती आई असो, कन्या असो, बहिण असो, कीं पत्नी असो, स्त्री तेवढी पुरुषाची आई ! तिच्या धीरावर पुरुष उभा राहतो, तिच्या धीरावर जगाच्या धडाक्याला तोंड देतो, तिच्याच धीरावर त्या धडाक्यांतून सहीसलामत शाबूत राहातो. बहिणीपाशीं भाऊ म्हणून नव्हे, अरू, आईच्या पायांशीं हें चुकलेलं पोर रडायला आलं होतं, त्याला उगी करण्यासाठीं नको का एक गाणं म्हणायला ?

अरुणाः—खरं आहे–दादा–खरं आहे !

अणूः—काय खरं आहे ?

अरुणाः—हें आमचं चुकलेलं बाळ—

अणूः—आमचं ? आमचं म्हणजे कुणाचं ?

अरुः—तुझं–माझं–या रेणूचं ! हें रागतं बाळ चाललं आहे ? कुठं चाललं आहे ? पाळण्यांत ! कुठल्या ? तुरुंगाच्या ! मग नको का त्याला एक गाणं म्हणायला ! चुकलें बरं दादा, मला क्षमा कर.

भैय्याः—( सर्व स्तब्ध असतां प्रवेश करून ) अरे ! हें काय ? सारींच चूपचाप बसलीं आहेत !

चंदूः—आम्हीं बोलतों आहोंत–मनांतल्या मनांत एकमेकांशीं

बोलतों आहोंत. ते शब्द मोठे नाजुक आहेत. ओठां-जिभेचा विटाळ त्यांना खपत नाहीं—म्हणून हे असे बोलतों आहोंत.

भैय्याः—थांब. बहकूं नकोस. रेणू, या दोघींना घेऊन आंत जा.

अणूः—कां ?–आतां कसली चोरी राहिली आहे ? साऱ्यांना सारं कांहीं कळलं आहे.

भैयाः—नाहीं. सर्वांना कळलं असलं तरी याला कळली नाहीं अशी एकच बाब आहे. हा ती ऐकत असतां तुम्हीं इथं नको. जा पाहूं. (त्या जातात.) ऐक चंदू, मन घट्ट कर—

चंदूः—( हंसून ) आतां आणखी मन घट्ट तें काय करायचं ? दगडाहून दगड बनलेला मी—

भैय्याः—पण त्यालाही पाझर फुटण्याजोगी गोष्ट आहे. ऐक, वैजूला पकडलं—

चंदूः—( ओरडून ) वैजूला ? वैजूला ? ?

भैयाः—होय. हा मूर्खपणा तुझा. केदारनाथानं अफिडेविट केलं आणि त्यावरून वैजूला पकडण्यांत आलं. ( 'वैजूला पकडलं' असें पुटपुटत चंदू मट्कन खालीं बसतो ) त्यांना तें माहित असावं–नव्हे आहे. केदारनाथच म्हणाला–अरूनं त्रागा केला, त्या तिरमिरींत त्यानं—

चंदूः—वैजूचा गळा कापला !

भैया:—त्यानं नव्हे—तूं!—मूर्खासारखा बोलत सुटलास! कृतज्ञतेलाही मर्यादा आहे. उपकार असतील—पण कांहीं उपकार बोलून दाखवणं म्हणजे गुन्हा होतो—त्यांतलाच हा एक. तूंच आपल्या मित्राचा गळा कापलास!

चंदू:—वैजू! वैजू! तूं सुद्धां तुरुंगांत येणार?

भैया:—सुद्धां नव्हे, कदाचित तूं सुटशील—

चंदू:—पूर्वीच्या गुन्ह्यांतून—भोगलेल्या शिक्षेंतून! पण ही केस जाम झाली आहे. यांत मी सांपडणार हें ठरलेलंच आहे. नव्हे—उद्यां मला शिक्षा सांगणार आहेत. पण वैजू! वैजू!! माझ्यासाठीं—महामूर्खा, माझ्यासाठीं आपला सत्यानाश करून घेतलास. (दिवाकर, मधुकर, बजाबा येतात.) या, दोस्त हो, या. Shake hands, old pals, shake hands आतां कां हटतां? तेव्हां साक्षी दिल्यात—

दिवाकर:—काय करावं बाबा, पोट आहे ना? तें त्या कंटकाच्या हातीं. धरला जबडा गुलामानं, म्हणून शेण खाल्लं—

मधुकर:—नाहीं तर नोकरी गेली असती!—क्षमा कर बेट्या!

भैय्या:—लाज नाहीं वाटत?

मधुकर:—नाहीं. क्षमा मागायला कसली लाज? झालं गेलं आतां कांहीं परत येत नाहीं. नुसती क्षमासुद्धां मागूं नये?

बजाबा:—त्यांत काय बिघडलं? क्षमा मागितली कीं गुन्हा

माफ. हें कांहीं कोर्ट नव्हे ! तिथं क्षमा मागून सुद्धां कुणी सुटत नाहीं. डिग्रीबिग्री असली तर तिचा उपयोग होतो म्हणा ! पण हा डिग्रीवाला नाहीं ना ? लेका, एकादी शाळा काढली असतीस–धर्मशाळा काढली असतीस अन् मग हातापाया पडला असतास, तर त्या शाळेंतल्या पोरां-साठीं कुणी तरी तुला दया दाखवली असती. पण तूं मुळचाच भद्रकपाळ्या !

चंदू:— निर्लज्ज–बेशरम–निघा इथून. पोट भरत नव्हतं, तर कांटे भरायचे होते पोटांत !—

मधुकर:—ते कां रे बाबा ? चांगलं अन्न मिळत असतां—

भैय्या:—खोटी साक्ष देऊन जीव जगवण्यापेक्षां भिक्षा कां नाहीं मागत ?

दिवाकर:—आपल्यासारख्या गडगंज श्रीमंतांना हें भाषण छान शोभतं, नोकरी सुटली म्हणजे काय होतं त्याचा अनुभव, भैय्यासाहेब, आपल्याला नाहीं. नोकरी घालवण्याच्या पापापेक्षां, साहेब, खोट्या साक्षीचं पाप फार कोवळं !

बजाबा: — कांटे भरायचे म्हणतो ! मग तूं रे बाबा कां खोटा चेक वटावलास ? व्यापार करायच्या ऐवजीं कांटे कां भरले नाहींस पोटांत ? परदुःख परशितळ अं !

चंदू:—खरं आहे. क्षमा करा. ( प्रत्येकाच्या पायाला हात लावून ‘ क्षमा करा ’ म्हणतो. ) या आतां. निघा. तोंड

काळं करा–चलो. ( एकेकाला गचांडी देतो. ) वैजू–वैजू–( रडत तोंड झांकतो. )

भैय्याः—मन घट्ट कर. देवाघरचा न्याय हा असा आहे. सद्‌बुद्धीनं वैजूनं खोटं काम केलं–तो तुरुंगांत जाणार ! दुर्बुद्धीनं–पोटभरूपणानं या तिघांनीं खोटं काम केलं–खोटी साक्ष दिली–आतां यांचा संसार मात्र सुखाचा होणार. हा न्याय देवाघरचा कीं सैतानाचा ?

चंदूः—सैतान आणि देव दोघेही सारखेच. दोघेही कुणी पाहिले नाहींत, म्हणून दोघांवरही वाटेल तो आळ, वाटेल त्यानं घ्यावा ! देव म्हणे देव ! देव–दैव–सैतान–सब्‌झूट–सब्‌झूट–सब्‌झूट ! ( केदार व माधव प्र. क. ) नाहीं. सैतान झूट नाहीं–हे पहा दोघे सैतान !—

केदारः—माझ्या घरांत मला सैतान म्हणतोस हरामखोरा ?

चंदूः—नाहीं. तुम्हीं सैतान नाहीं–तुम्हीं मूर्ख आहांत–महामूर्ख आहांत. मुलीचं लग्न झालं पाहिजे–नाहींतर जात जाते–असं खरोखरीच पटण्याइतके तुम्हीं महामूर्ख आहांत. पण हा मात्र खरा सैतान ! हंसतोस काय ? आतां अणिमा मिळाली तुला ?

माधवः—न कां मिळेना–पण तुला तर मिळत नाहीं !

चंदूः—ऐक मूर्खा, ( ओरडून ) आज संध्याकाळीं आमचं लग्न होणार. ( अणिमा, रेणू, अरुणा, दचकून येतात. ) होय ना अणू ?

अणू:—काय ?

चंदू:—आज संध्याकाळीं आपलं लग्न होणार. पंडित लक्ष्मणराव ओघळ्यांना मी सांगून आलों आहें. कबूल ?

अणू:—कबूल—अगदीं कबूल ! त्रिवार कबूल !

केदार:—आणि हा उद्यां तुरुंगांत गेल्यावर ?

चंदू:—विधवा—सवाष्ण विधवा ! हा ढळढळीत कुंकवाचा मळवट भरलेली विधवा !

रेणू:—दादा !

चंदू:—खरंच—तुला मी विसरलों होतों. तूं कुमारी राहणार कीं विधवा होणार ? दोन्हीं सारखींच आहेत बरं—दोन्हीं सारखींच. लग्नाचा विधि म्हणजे नुसतं ढोंग करायचं. या कटंकासाठीं तें एक कांटेरी कुंपण घालायचं. पोरींनो, तुम्ही साऱ्या सारख्याच आहांत. जशी ही अरू—तशीच ही अणू—तशीच ही रेणू ! साऱ्या बहिणी ! मी सर्वांचा दादा ! Shake hands ! केदार भावोजी Shake hands ! (त्याचा हात धरून बळेंच Shake hand करतो. )

केदार:—हट्—बदमाष ! हट्—जाव ! तुझ्या या पापी हातांचा मला स्पर्श नको.

अरुणा:—हें चंदूनं म्हणायला हवं होतं !

केदार:—काय म्हटलंस ?

अरुणा:—पापी हात कुणाचे असतील तर ते तुमचे. बाय-

कोच्या भावाच्या गळ्याला निष्कारण तांत लावणारे हे हात, झडून पडतील.

केदारः—ही बायको बरं, ही बायको ! तुला चाड आहे का अब्रूची ? बेसत्रा ! घराण्याला कलंक लावणारा हा Jail-bird पुनः तुरुंगांत जाणार म्हणून तुला आनंद व्हायला हवा होता.

रेणूः—आणि वैजनाथ ? त्यानं कलंक लावला होता का तुमच्या घराण्याला ? बेशरम माणसा, जनाची नाहीं पण कांहीं मनाची चाड ! पुण्यवंताला नांवं ठेवतोस ? पापी राक्षसा, तुझ्याकडे पाहिलं, कीं असं वाटतं–' नवरा ' हा शब्दच जगांतून नाहींसा व्हावा.

केदारः—ऐका भैय्यासाहेब, ही तुमची मुलगी ! कुणा भाग्यवंताचं नशीब उघडणार—

रेणूः—कुणाचंही नाहीं. तुमचं वैभव पाहिलं तेवढं भरगच्च झालं. दादा, चल घरीं.

चंदूः—रेणू, अरु, घरीं उद्यां जायचं आहे–आज नव्हे. आज मी धर्मशाळेंत मुक्काम करणार ! उद्यां मी माझ्या सत्तेच्या घरीं जाणार. त्या घरीं लग्न नाहीं–बायको नाहीं–घराचा घरोबा, कुलाचा अभिमान, कांहीं सुद्धां नाहीं. त्या घरीं जो एकदां गेला त्याला त्या घराशिवाय दुसरा थारा नाहीं. तिथंच तो राहायचा. हवा खायला थोडा बाहेर यायचा

आणि गांवच्या पाखरासारखा पुन: विश्रांतिसाठीं आपल्या घरट्यांत जायचा.

अरुणा:—आणि मी कुठं जायचं दादा ?

चंदू:—तूं इथंच आहेस. हा तुझा नवरा—तुझा पतिदेव ! हा तुझा देव्हारा—तूं इथली गृहदेवता !—

अरुणा:—नाहीं दादा, देवपण मला नको आहे. माझंही नको आणि पतीदेवाचंही नको. मीही इथून जाणार !—

केदार:—Restitution of conjugal rights च्या आधारावर तुला खेंचून घरीं परत आणिन.

अरू:—कुठून ? या पतित भावाची मी बहीण—मीही पतित आहें. आज नसलें, तुम्हीं असा पिच्छा पुरवूं लागलांत तर—तर मीही पतिता होईन. समजलं ? मीही पतिता होईन !

चंदू:—पतित भावाची पतिता बहीण ! आणि अणू, या पुण्यात्म्याची तूं पुण्यवान बहीण—तूं कुठं जाणार ?

रेणू:—तिघींचंही एकच स्थान—एकच घर—एकच आत्मा—एकच शेवट !

चंदू:—एकच शेवट—एकच शेवट ! ( आंत वैजनाथ चंदूला हांक मारतो. ) कोण ? वैजू—वैज्या—माझा जिवजान वैज्या ! ( वैजू येतो. ते कडकडून भेटतात. ) आतां माझा—माझा—माझाच वैज्या ! चल—संध्याकाळ झाली. नाहीं—उद्यां संध्याकाळ झाली कीं आपण आपल्या घरट्यांत जाऊं !

भैया:—जामिन गुदरला ?

वैज:—होय. मी माझा गुन्हा कबूल केला. बिचारा जामिन फुकट गेला. तळमळत बाहेर राहाण्यापेक्षां तो तुरुंगवासच मला सुखाचा वाटला—

चंदू:—खरं आहे—खरं आहे. असल्या चांडाळांच्या धाग्यांनीं विणलेलं हे जगाचं गोणपाट पेहेरण्यापेक्षां आपलं तें खरंखुरं गोणपाट फार छान! चल वैजू—( जाऊं लागतात. )

अणू:—आणि मी ?

चंदू:— तें आपलं ठरलंच आहे.

अरु:—गुड बाय्—मिस्टर केदारनाथ रेगे, गुड् बाय्! ( चौघें जातात )

केदार:—कुठं चाललीस!—कुठं चाललीस ?

भैया:—वाट फुटेल तिकडे! केदारनाथ नमस्कार.

रेणू:—माधवराव, नमस्कार. ( दोघें जातात )

केदार:—हरहर! माधवराव, काय झालं हें ?—साऱ्या संसाराचा तुरुंग झाला! अब्रू—अब्रू—माझी अब्रू! माधवराव, माझी अब्रू गेली! ( गच्चीवर जाऊन खालीं पाहातो )

माधव:—असा धीर सोडून कसं चालेल. आतां पुढला मार्ग पाहिला पाहिजे. आतां आपण दोघेही लग्नाला योग्य झालों आहोंत. चला—पुढल्या मार्गाला लागा.

( पडदा )

ॐ तत्सत्
क्र. ...९८५३
वि. ...आरेण